## रायगडातील १८ नवदुर्गांचा पोलीस दलाकडून सन्मान



**अलिबाग** : रायगड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने नवदुर्गा सन्मान सोहळा २०२३ अंतर्गत पुरस्कारांचे वितरण बुधवारी (दि. २५) नागोठणे येथे करण्यात आले. या सोहळ्यास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमात मंत्री आदिती तटकरे यांच्यासह सामाजिक, शासकीय, पोलीस, वैद्यकीय आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या १८ महिलांचा नवदुर्गा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ९९
www.ramprahar.com

गुरुवार, २६ ऑक्टोबर २०२३ ◆पाने ८ ◆किंमत ₹ २


## अंतरंग


नवीन पनवेलमध्ये बोगस कॉल सेंटरवर कारवाई/३

महाड शहरात दोन गटांमध्ये हाणामारी; गुन्हा दाखल/५

कबड्डी स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालयाला रौप्यपदक/८


# पंतप्रधान मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

## शिर्डी दर्शन, निळवंडे धरण जलपूजन सोहळा | ७५०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन | नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचाही शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी (दि. २६) महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते ७५०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन, शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन तसेच ८६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत लाभ देतील आणि निळवंडे धरणाचे जलपूजन करून कालव्याचे जाळे देशाला समर्पित करणार आहेत.



पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार या दौऱ्यादरम्यान दुपारी १च्या सुमारास पंतप्रधान नरेंद्र मोदी शिर्डी येथे पोहचतील. श्री साईबाबा समाधी मंदिरात पूजा व दर्शन करून मंदिरातील नवीन दर्शन रांग संकुलाचे उद्घाटनही ते करणार आहेत. दुपारी २ वाजता पंतप्रधान निळवंडे धरणाचे जलपूजन करतील आणि धरणाच्या कालव्याचे जाळे राष्ट्राला समर्पित करतील. तद्नंतर ३.१५च्या सुमारास ते शिर्डी येथे एका सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित राहून आरोग्य, रेल्वे, रस्ते आणि तेल आणि वायू यांसारख्या क्षेत्रातील सुमारे सात हजार ५०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत.

शिर्डी संस्थान येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त नवीन दर्शन रांग संकुलाचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. या नवीन इमारतीत विविध सुविधांची सोय करण्यात आली आहे. यामध्ये १० हजारांहून अधिक भाविकांच्या एकत्रित आसनक्षमतेसह अनेक वेटिंग हॉल, क्लोक रूम, स्वच्छतागृहे, बुकिंग काउंटर, प्रसाद काउंटर, माहिती केंद्रासारख्या वातानुकूलित कक्षांची सोय आहे.

साईबाबांचे दर्शन घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी निळवंडे धरणाच्या डाव्या काठ (८५ किमी) कालव्याचे जाळे राष्ट्राला समर्पित करतील. यामुळे पाण्याचे पाइप वितरण जाळे सुकर होईल व सात तालुक्यांतील (अहमदनगर जिल्ह्यातील सहा आणि नाशिक जिल्ह्यातील एक) १८२ गावांना याचा लाभ होईल. या धरणासाठी सुमारे पाच हजार १७७ कोटी रुपये खर्चून ते विकसित केले जात आहे.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. या योजनेचा महाराष्ट्रातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या ८६ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांची अतिरिक्त रक्कम देऊन त्यांना लाभ होईल.

पंतप्रधान मोदी हे त्यांच्या व्यस्त दौऱ्यात ते अहमदनगर शासकीय रुग्णालयामधील आयुष हॉस्पिटलसह अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि लोकार्पण, कुर्डुवाडी-लातूर रोड रेल्वे विभागाचे विद्युतीकरण (१८६ किमी); जळगाव ते भुसावळ जोडणारा तिसरा आणि चौथा रेल्वे मार्ग (२४.४६ किमी); एनएच १६६ (पॅकेज-१)च्या सांगली ते बोरगाव विभागाचे चौपदरीकरण; इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या मनमाड टर्मिनलवर अतिरिक्त सुविधा आदी प्रकल्पांचे उद्घाटन तसेच माता व बाल आरोग्य शाखेची पायाभरणी, आयुष्मान कार्ड आणि स्वामित्व कार्डचे वाटप करणार आहेत.



**कळंबोली : शिवशंभो सामाजिक विकास मंडळ व आदर्श सामाजिक संस्था, रोडपाली येथील नवरात्रोत्सवात दसऱ्यानिमित्त रावण दहन करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांचे आयोजकांच्या वतीने माजी नगरसेवक अमर पाटील यांनी स्वागत केले. सोबत भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, संदीप म्हात्रे, अमर ठाकूर आदी.**



**(छाया : संकेत भोईर)**

# अलिबागमध्ये मुलाने आईला जिवंत जाळले

**रेवदंडा, अलिबाग : प्रतिनिधी**

मुलाने आपल्या आईला जाळल्याने यात तिचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना अलिबाग तालुक्यातील सुडकोलीनजीकच्या नवखार गावात मंगळवारी घडली. चांगुणा नामदेव खोत (६५) असे मृत्यू पावलेल्या आईचे नाव असून आरोपी मुलगा जयेश नामदेव खोत (२६) याला पोलिसांनी अटक केली आहे.

आयटीआयचे शिक्षण पूर्ण केलेल्या जयेश खोत याचे मंगळवारी (दि. २४) सायंकाळी ७च्या सुमारास आई चांगुणा खोत हिच्याशी जेवणावरून भांडण झाले. या वेळी जयेश आईला हाताबुक्क्याने व लाकडी दांडक्याने मारहाण करू लागला तसेच घरात असलेला कोयता घेऊन तिच्या डोक्यावर मारून तिला दुखापत केली. या हल्ल्यात चांगुणा खोत जखमी झाल्या. नंतर जयेशने जखमी आईला मोकळ्या जागेत नेले व तिच्यावर पालापाचोळा टाकून तिला पेटवून दिले.

याबाबत गावातील लोकांना लोकांनी पोलिसांना कळवले तसेच जखमी चांगुणा खोत यांना उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आणले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी जयेश खोत याला पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

## आमदार अपात्रतेसंदर्भात आज होणार सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबद्दलची सुनावणी गुरुवारी (दि. २६) दुपारी ४ वाजता विधानसभा अध्यक्षांसमोर होणार आहे.

दोन्ही गटांना सर्वोच्च न्यायालयात सादर केलेली कागदपत्रे जमा करण्याची मुदत बुधवारी संध्याकाळी ४ वाजता संपली. त्यानंतर यासंबंधित ३४ याचिकांचे सहा गट तयार करून त्यावर सुनावणी होणार आहे.

## निवडक

### ऑनलाईन गेमिंग कंपन्यांना जीएसटी चुकवल्याने नोटीस

**नवी दिल्ली** : वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) चुकवेगिरीप्रकरणी देशातील ऑनलाईन गेमिंग कंपन्यांना आतापर्यंत एक लाख कोटी रुपयांच्या कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. सरकारने जीएसटी कायद्यात सुधारणा केली असून २८ टक्के जीएसटी संपूर्ण रकमेवर लावला जाणार आहे, तर परदेशी ऑनलाईन गेमिंग कंपन्यांना १ ऑक्टोबरपासून भारतात नोंदणी करणे बंधनकारक केले आहे.

### भाजप नेते निलेश राणे पुन्हा राजकारणात सक्रिय

**मुंबई** : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे पुत्र माजी खासदार निलेश राणे यांनी राजकारणातून निवृत्ती घेण्याचा निर्णय २४ तासांत मागे घेतला आहे. मंत्री रवींद्र चव्हाण बुधवारी (दि. २५) निलेश राणे यांना घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर पोहचले. तेथील चर्चेनंतर निलेश यांनी भाजपच्या सेवेत पुन्हा रूजू होण्याची तयारी दर्शविली आहे.

# वासांबे विभागातील शेकाप, काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिस (ता. खालापूर) येथील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मुकुंदशेठ जांभळे आणि युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सागर सुखदरे यांनी समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत शेकाप आणि काँग्रेसला झटका बसला आहे. आमदार महेश बालदी यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

भाजप पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात मंगळवारी (दि. २४) झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिन तांडेल, भूषण पारंगे, दिलीप पारंगे, आत्माराम जांभळे, प्रल्हाद मुंढे, जगदीश जांभळे, प्रतिक पारंगे, प्रवीण घरत, विशाल पारंगे, रोहन माळी, आदेश पारंगे, वैभव पारंगे, राहुल मगर, दत्ता कांबळे, सुर्यकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

# केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना दिवाळी भेट

## रब्बी हंगामात खत खरेदी सबसिडीला मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने आनंदाची बातमी दिली आहे. सरकारने रब्बी हंगामात खत खरेदीवरील सबसिडीला मान्यता दिली. त्यामुळे देशातील १२ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट आणि सीसीईए बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे.

रब्बी हंगाम २०२३-२४साठी न्यूट्रिएंट बेस्ट सब्सिडी फिक्स करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यात नायट्रोजर प्रतिकिलो ४७.२ रुपये, फॉस्फोरस २०.८२ रुपये, पोटॅश २.३८ रुपये आणि सल्फरवर १.८९ रुपये प्रतिकिलो सबसिडी देण्यात आली आहे.



**पनवेल : अत्यंत गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्याची शिताफीने आणि धाडसाने उकल करीत सहा नायजेरियन सायबर गुन्हेगारांना दिल्लीतून जेरबंद करणारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे व त्यांच्या टीमचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन व कौतुक केले. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर तसेच उमेश इनामदार, प्रसाद हनुमंते आदी उपस्थित होते.**

# रोह्यात श्री धाविर महाराजांचा पालखी सोहळा उत्साहात

## पोलिसांकडून मानवंदना; मान्यवरांची उपस्थिती

**रोहा : प्रतिनिधी**


रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या पालखी सोहळ्यास बुधवारी (दि. २५) पहाटे मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या वेळी राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी विधिवत पूजा केली.



या सोहळ्यास महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. रायगड पोलिसांच्या वतीने निरीक्षक प्रमोद बाबर व पथकाने श्री धाविर महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली. या वेळी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला गेला होता.

**(सविस्तर पान ७ वर..)**





## वर्ल्डकपमध्ये मॅक्सवेलचे सर्वांत वेगवान शतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने नेदरलँडविरुद्धच्या सामन्यात केवळ ४० चेंडूंत वादळी शतक ठोकले. कोणत्याही विश्वचषकातील हे सर्वांत वेगवान शतक आहे.

यापूर्वी याच विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेचा ॲडन मारक्रमने ४९ चेंडूंत शतक ठोकले होते. मॅक्सेवलने त्याच्या पुढे जात तुफानी खेळी केली. मॅक्सेवल एकूण ४४ चेंडूंत नऊ चौकार व आठ षटकारांसह १०६ धावा करून माघारी परतला. ऑस्ट्रेलियाने नेदरलँडविरुद्ध ५० षटकांत ८ बाद ३९९ धावांचा डोंगर रचला होता. नेदरलँडचा संघ २१ षटकांत ९० धावांत गारद झाला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने ३०९ धावांनी वर्ल्डकपमधील मोठा विजय साकारला.

# कर्जत तालुक्यात पीक स्पर्धा; शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

भाताचे कोठार म्हणून समजल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यात भाताचे विक्रमी पीक घेतले जाते. त्यामुळे भातपीक स्पर्धेचे आयोजन करण्यात येताच असंख्य शेतकरी भात तसेच नाचणी पीक स्पर्धेत सहभाग घेत आहेत. कर्जत तालुक्यात चार मंडळात ही स्पर्धा होत असून भाताची कापणी, मळणी आणि मोजमापे आदी कामे कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सुरू असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड यांनी दिली.



तालुक्यात भात हे सर्वाधिक प्रमाणात घेतले जाणारे पीक असून सध्या तालुक्यात नऊ हजार हेक्टर जमिनीवर भाताचे पीक घेण्यात येत आहे. नाचणी आणि भात पीक स्पर्धेत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. जुलै महिन्यात भातपीक आणि नाचणी पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्यात आले होते. भातपीक स्पर्धेसाठी शेतकऱ्यांना २० गुंठे क्षेत्र, तर नाचणीच्या स्पर्धेसाठी ४० गुंठे जमिनीवर पीक घेणे बंधनकारक असते. स्पर्धेसाठी सर्वसाधारण वर्गातील शेतकऱ्यांकडून ३०० रुपये, तर आदिवासी शेतकऱ्यांकडून १५० रुपये फी शासन घेत असते. कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सध्या शेतकऱ्यांच्या शेतात बहरलेल्या पिकांची कापणी सुरू आहे.

२० गुंठे क्षेत्रातील कोणत्याही एक गुंठे क्षेत्रातील भातपिकाची कापणी झाल्यानंतर काही वेळाने मळणी करण्यात येते आणि त्याच ठिकाणी भाताचे वजन तसेच पेंढ्याचेदेखील वजन कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी करून घेत असतात.

या वर्षी भात आणि नाचणी पीक स्पर्धेत कर्जत तालुक्यात ५२ शेतकऱ्यांनी भाग घेतला आहे. तालुक्यातील कृषी विभागाचे चार कृषी पर्यवेक्षक असून त्यांच्या हद्दीत तालुक्यातील सर्व गावे आणि आदिवासी वाड्या यांचा समावेश आहे. तालुक्यात कर्जत, कळंब, कशेळे आणि नेरळ असे विभाग असून तेथे शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत भाग घेतला आहे. यातून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळत आहे.

# राज्यातील १३ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक लाभ

## पीएम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी ठरले पात्र

**मुंबई : प्रतिनिधी**

पीएम किसान योजनेचा पुढील हप्ता तसेच नमो किसान महासन्मान योजनेचा पहिला हप्ता देण्याच्या पार्श्वभूमीवर पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे तसेच अन्य अटींची पूर्तता करण्यासाठी ऑगस्ट महिन्यापासून विशेष मोहीम राज्य शासनामार्फत राबविण्यात येत होती. या मोहिमेद्वारे राज्यातील १३ लाख ४५ हजार शेतकरी पीएम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी पात्र ठरले असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

कृषीमंत्री मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढाकार घेत



कृषी, महसूल, भूमी अभिलेख आदी विभागांचा समन्वय साधून ई-केवायसी पूर्ण करणे, भूमी अभिलेखाच्या नोंदी अद्ययावत करणे, आधार बँक खात्याशी संलग्न करणे आदी बाबींची पूर्तता करून घेत राज्यातील १३ लाख ४५ हजार शेतकरी या दोन्हीही योजनांच्या लाभास पात्र ठरविण्यासाठी यश आले आहे.

पीएम किसान योजना नव्याने सुरू करण्यात आली त्या वेळी राज्यातील सुमारे एक कोटी १९ लाख शेतकऱ्यांनी या योजनेत नोंदणी केली होती. त्यापैकी सुमारे ९५ लाख शेतकरी पात्र ठरले, मात्र अटींची पूर्तता न केल्याने १३व्या आणि १४व्या हप्त्यात त्यापैकी ८५ लाख ६० हजार शेतकऱ्यांना पीएम किसानचा

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका क्लिकवर होणार वितरण

***राज्य शासनाने घोषित केलेल्या नमो किसान महासन्मान योजनेतून राज्यातील सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांना दोन हजार रुपयांप्रमाणे पहिल्या हप्त्याचे गुरुवारी (दि. २६) रोजी शिर्डी (जि. अहमदनगर) येथे होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका क्लिकवर वितरण करण्यात येणार असून यासाठी कृषी विभागाने १७२० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती कृषीमंत्री मुंडे यांनी दिली.***

प्रत्यक्ष लाभ मिळाला. उर्वरित शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ घेता आला नाही. ९५ लाखांपैकी मृत, कर भरणारे व इतर कारणांनी रद्द करून ९२.८७ लाख शेतकरी पात्र ठरत आहेत. त्यापैकी ८२.५९ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण झालेले होते.

ग्रामपंचायत पदाधिकारी, कृषीमित्र यासह कर्मचाऱ्यांनी शिबिरे घेत आणि बांधावर जात १३ लाख ४५ हजार शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण, बँक खाते संलग्न करणे, भूमी अभिलेख नोंदी पूर्ण करून अद्ययावत करून घेणे या अटींची पूर्तता करून घेण्यात आली. यामध्ये ९.५८ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे, २.५८ लाख शेतकऱ्यांचे खाते आधार संलग्न करणे, १.२९ लाख शेतकऱ्यांचे भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करण्याबाबतचे कामकाज पूर्ण झाले आहे.

# रायगडातील बसस्थानकांसाठी पाच कोटींचा निधी -ना. सामंत

**रोहे : प्रतिनिधी**

राज्यातील बसस्थानकांच्या सुधारणेसाठी ५०० कोटी रूपये देण्यात येणार असून या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील बसस्थानकांसाठी पाच कोटी देण्यात येणार आहेत. त्यात रोह्यासाठी ७५ लाख निधी देण्यात येईल, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी (दि. २५) येथील पत्रकार परिषदेत दिली.



या वेळी शिवसेना तालुका प्रमुख अ‍ॅड. मनोजकुमार शिंदे उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, धाटाव औद्योगिक क्षेत्रात साडेआठ कोटी खर्च करून नवीन विश्रामगृह बांधण्यात येणार आहे. रोहा उपजिल्हा रुग्णालयात अनेक त्रुटी आहेत. या अनुषंगाने रोहा उपजिल्हा रुग्णालयास साहित्य आरोग्य विभागाकडून देण्यात येणार आहे.

बायपास व शहरातील रस्ते यांना निधी देणार असून गटारे व अंडरग्राऊंड विद्युतीकरण आदी काम पाहून पुढील काम करणार असल्याचे सांगितले. दिवाबत्तीचा प्रश्न उपस्थित होत असल्याने औद्योगिक विकास विभागाच्या माध्यमातून हे काम करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

धाटाव औद्योगिक क्षेत्रात फायर ब्रिगेड साठी नवीन गाडी देण्यात येणार आहे. रोहा नगर परिषदेस मोठ्या प्रमाणात निधी देणार असून नगरपालिका हद्दीतील रस्त्यांसाठी ८५ लाख देणार असून नगरपालिका हद्दीत कामासाठी अडीच कोटींचा निधी देण्यात येणार आहे.

औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून कामगार रुग्णालय उभारणार असून जिल्ह्यातून तळोजा, रोहा व महाड येथे कामगार रुग्णालयाचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात येणार आहे. अनेक उद्योग रायगड जिल्ह्यात येणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. रोहा तालुक्यातील खारी व तांबडी येथे चेकपोस्ट पुन्हा सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इंग्रजांच्या काळापासून म्हणजे १८६२पासून श्री धावीर महाराजांना सलामी दिली जाते. ती भव्य स्वरूपात असली पाहिजे. यासाठी आपण पोलीस विभागाला सूचना दिल्या असून पुढील वर्षी शासकीय सलामी दिमाखदार पद्धतीने व सगळ्यात मोठी सलामी पुढच्या वर्षापासून दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# आता काँग्रेसी हृदयसम्राट बालिशसाहेबांचे आपटीबार फुटतात!

## भाजप नेते आशिष शेलार यांची उद्धव ठाकरेंवर टीका

**मुंबलई : प्रतिनिधी**

दसरा मेळाव्यामधून शिवसैनिकांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी केंद्रातील भाजप सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोचरी टीका केली. एकेकाळी बाळासाहेब ठाकरे यांनी देशाला मजबूत सरकारची आवश्यकता असल्याचे बोलून दाखवले होते, मात्र गेल्या नऊ वर्षांपासून पाशवी बहुमत असलेल्या सरकारचा आपण अनुभव घेतलाय. उद्धव ठाकरे यांच्या या टीकेला भाजपानेदेखील उत्तर दिले आहे. शिवतीर्थावर पूर्वी वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंची तोफ धडाडायची, आता... काँग्रेसी हृदयसम्राट बालिशसाहेबांचे आपटीबार फुटतात, असे म्हणत जोरदार हल्लाबोल केला आहे. भाजपचे नेते आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केले आहे.

परमपूज्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी नागपूरात वाटले ते खरे विचारांचे सोने! शिवसैनिकांचा खरा भरगच्च मेळावा आझाद मैदानात महाराष्ट्राने पाहिला!!शिवतीर्थावर पुर्वी वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंची तोफ धडाडायची !!!आता... काँग्रेसी हृदयसम्राट बालिशसाहेबांचे आपटीबार फुटतात! मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ऐकेरी उल्लेख केलात, त्यावरुन तुमची पातळी दिसली. सोबत पंतप्रधानांनी भ्रष्टाचार, घराणेशाहीच्या विरोधात दिलेला काढ्याचा असर झालाय हेही सगळ्यांना कळले!! हल्ली मळमळ, उलट्या, अपचन यांचे करपट ढेकरांना हे विचारांचे सोने म्हणतात!! असे भाजप नेते आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थावर काँग्रेसधार्जिणी भूमिका घेत पुन्हा एकदा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली दिली. खरं तर हिंदुत्वाचा वारसा मिळूनही उद्धव ठाकरे यांना इंडिया आघाडीचे गोडवे गावे लागत आहेत. नरेंद्र मोदीजींचे कर्तृत्व संपूर्ण देशाने मान्य केले आहे, पण उद्धव ठाकरे त्यांच्यावर टीका करीत आहेत. खरे तर ती त्यांची पात्रता नाही.

संपूर्ण देश मोदीजींचे कुटुंब आहे पण 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' म्हणणाऱ्या उद्धव ठाकरेंना ते कळणार नाही. उद्धव ठाकरे शिवतीर्थावर बोलताना हिंदू धर्म संपवण्याची भाषा करणाऱ्या उदयनिधी स्टॅलिनबद्दल बोलतील असं वाटलं होतं, पण ते मूग गिळून गप्प बसले. कंत्राटी पद्धतीने भरती सुरू केल्याबद्दल ते आज तरूणांची माफी मागतील, असं वाटलं पण त्यांना स्वतः च्या मुलाच्या भविष्याची जास्त चिंता वाटत आहे, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

# ऑलिम्पिकमधील विजयी खेळाडूंचा राज्यपालांनी केला सत्कार



**मुंबई : प्रतिनिधी**

बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींसाठी बर्लिन येथे झालेल्या स्पेशल ऑलिम्पिकमध्ये देशासाठी पदकांची लयलूट करणाऱ्या महाराष्ट्रातील २० खेळाडू व प्रशिक्षकांचा राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते बुधवारी (दि. २५) राजभवन मुंबई येथे सत्कार करण्यात आला.

बौद्धिक दिव्यांग मुलामुलींनी ऑलिम्पिकमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात पदक प्राप्त करणे, हा राज्यासाठी तसेच देशासाठी बहुमान आहे, असे राज्यपालांनी या वेळी सांगितले.

पूर्वी ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये भारत पदकतालिकेत खालच्या क्रमांकावर राहत असे. परंतु, यावर्षी झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताने पदकांचे शतक पार केले आहे. आज भारत खेळामध्ये आघाडीवर येत आहे आणि त्यात दिव्यांग खेळाडूदेखील आघाडीवर आहेत, ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

राज्यपालांच्या हस्ते क्रीडा प्रशिक्षक व युनिफाईड पार्टनर्स यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रभाग संचालक डॉ. भगवान तलवारे, तसेच बर्लिन स्पेशल ऑलिम्पिकमधील सुवर्ण, रजत व कांस्यपदक विजेते उपस्थित होते.

स्पेशल ऑलिम्पिकमध्ये भारतातून १९४ खेळाडू सहभागी झाले होते. त्यांनी देशासाठी २०२ पदके जिंकली. महाराष्ट्रातील खेळाडूंनी या स्पर्धेत २० पदके जिंकली, असे स्पेशल ऑलिम्पिक भारतच्या महाराष्ट्र अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया यांनी सांगितले.

# पनवेल परिसरात रावण दहन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अन्याय, अहंकारी, पापी वृत्तीचे प्रतिक असलेल्या रावणाचे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रावण दहन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन सर्व नागरिकांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने नवरात्रीनिमित्त झंकार नवरात्रोत्सव २०२३चे आयोजन करण्यात आले होते. गेले नऊ दिवस मोठ्या जल्लोषात हा उत्सव मिडलक्लास सोसायटीच्या मैदानात सुरू होता. त्यानंतर विजयादशमीच्या दिवशी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत रावण दहन करण्यात आले तसेच या वेळी रामलीलाचे आयोजन करण्यात आले होते. रावण दहन झाल्यानंतर देवीची विसर्जन मिरवणूक ढोल ताश्याच्या गजरात काढण्यात आली. या मिरवणुकीत आमदार प्रशांत ठाकूर ही सहभागी झाले होते.

या कार्यक्रमांवेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी उपनगरअध्यक्ष मदन कोळी, संजय भगत, सुमित झुंजारराव, मयुरेश किस्मतराव, संजय जैन, निखिल ठक्कर, रुपेश नागवेकर, अर्चना परेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तक्क्यामध्येही रावण दहनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उपस्थितांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, प्रतिक बहिरा, सोसायटीचे माधव पंड्या, भारद्वाज, पवनकुमार त्रिपाठील, संजीव सांडविले, अरुण खेडवल, प्रशांत गौंड, आर. के. सिंग, मनोजकुमार आदी उपस्थित होते.





# ऑनलाईन टास्कच्या नावाखाली ११ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

वेळोवेळी नवीन 'टास्क देऊन त्यात रक्कम गुंतवण्यास सांगून पाच टास्क करता एकूण अकरा लाख वीस हजारांची रक्कम परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

योगेंद्र कुशवाह हे खारघर, सेक्टर १९ येथे राहत असून एका कंपनीत मॅनेजर आहेत. त्यांना व्हॉट्सअ‍ॅपवर अदिती उपाध्याय यांनी गुगल रेटिंग प्रमोशन करण्याबाबत पार्टटाईम जॉबची माहिती दिली. तिच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी रिव्ह्यू दिले व त्याचा व्हॉट्सअ‍ॅपवर स्क्रीनशॉट पाठवला असता २०३ रुपये कमिशन पाठवणार असल्याचे सांगून बँक खाते मागितले. त्यानंतर २०३ रुपये जमा झाले त्यांना टेलिग्राम ग्रुपवर जॉइन करून घेतले व हॉटेलबाबतचे रिव्ह्यू आले होते त्याला फाईव्ह स्टार रेटिंग दिले असता दुसरा इकॉनॉमिक टास्क दिला तर त्यांनी तो केला नाही. त्यानंतर काही वेळात त्यांना रिव्ह्यू आले. त्यानंतर एक हजार रुपये पाठवले.

रिव्ह्यू केले असता खात्यावर कमिशनसह १५०० रुपये जमा झाले. त्यानंतर टेलिग्रामवरील नवीन ग्रुपला त्यांना जॉइन केले ते ग्रुपवर इकॉनॉमिक ग्रुप टास्क देत होते. मलाया हिने पाच हजार रुपये भरण्यास सांगितले. ती रक्कम त्यांनी भरली. त्यानंतर सव्वालाखाचा तिसरा टास्क आला. या वेळी एकूण ४५ हजार बॅलन्स दिसल्याचे सांगून हा टास्क करावा लागेल, मगच सर्व रक्कम मिळण्याचे आमिष दाखवले.

## पनवेल बस डेपो येथून एकाचे अपहरण

**पनवेल : वार्ताहर**

लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहणाऱ्या एकाचे पनवेल एसटी बस डेपो येथून पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीमध्ये जबरदस्तीने बसवून पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात महिलेने केली आहे.

अपहृत व्यक्ती हा एका महिलेबरोबर लिव्ह इन रिलेशनमध्ये राहत होता व ते दोघेही एसटी महामंडळामध्ये कामाला आहेत. दरम्यान सदर इसमाला लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहत असल्याच्या कारणावरून काही अज्ञात व्यक्तींनी पनवेल एसटी बस डेपो येथून पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीमध्ये जबरदस्तीने बसवून पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात सदर महिलेने केली आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलीस या व्यक्तीचा शोध घेत आहेत.

## उरणमध्ये सरपंचपदासाठी नऊ, तर सदस्यपदासाठी ८१ उमेदवार रिंगणात

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील तीन ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदाकरीता आणि ४१ सदस्यपदासाठी बुधवारी (दि.२५) उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर सरपंचपदाचे नऊ व सदस्यपदाचे ८१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्याची माहिती उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली आहे. तालुक्यातील जासई, चिरनेर आणि दिघोडे या तीन ग्रामपंचायतींची निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी होणार आहेत.

बुधवारी शेवटच्या दिवशी जासई ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदाच्या निवडणुकीसाठी तीन तर १७ सदस्यपदासाठी ३४ उमेदवार रिंगणात आहेत. चिरनेर ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी दोन तर १४ सदस्यपदासाठी २८ उमेदवार रिंगणात आहेत. दिघोडे ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी चार तर नऊ सदस्यपदासाठी १९ उमेदवार रिंगणात आहेत. असे तीन ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी नऊ तर तीनही ग्रामपंचायतींच्या ४१ सदस्यपदासाठी ८१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

सरपंचपदाचे सात तर सदस्यपदाचे ३८ असे ४५ अर्ज मागे घेण्यात आले आहेत. तीन सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. उमेदवारांना निवडणूक चिन्हांचेही वाटप करण्यात आले आहे.

## कामोठ्यात तरुणाची टेलिग्राम अ‍ॅपद्वारे झाली फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

कामोठेमधील एका तरुणाची २६ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. याविषयी ऑनलाईन फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे सेक्टर ३०मध्ये राहणारा गणेश हा तरुण एका बँकेमध्ये सेल्स एक्झिक्युटीव्ह पदावर काम करीत आहे. त्याच्या मोबाइलवरील टेलिग्राम अ‍ॅपवर एक मेसेज आला असून त्यामध्ये पार्टटाईम जॉब मिळवून देण्याचे आमिष दाखविण्यात आले. एका ग्रुपवर लिंक पाठवून लाईक व सबस्क्राईब करण्यास सांगितले. पहिले तीन टास्क पूर्ण केल्यानंतर त्यांच्या खात्यात १५० रुपये जमा करण्यात आले. यानंतर ५०० नंतर एक हजार, १७०० अशी रक्कम भरण्यास सांगितली. त्याबदल्यात बीट कॉईन जमा झाल्याचे दाखविण्यात आले. एक आठवड्यात विविध टास्क सांगून २६ हजार रुपये हडप करण्यात आले असून, याविषयी ऑनलाईन फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बोगस कॉल सेंटरवर कारवाई

## नवीन पनवेलमध्ये छापा; १६ जण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर ११मधील एका रो-हाऊसमध्ये बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या बोगस कॉल सेंटरवर खांदेश्वर पोलिसांनी छापा मारून १६ जणांना ताब्यात घेतले आहे. या टोळीने ॲमेझॉन (गीक स्कॉड) पेलाल या नावाने अमेरिकेतील नागरिकांना इंटरनेट कॉलद्वारे संपर्क साधून त्यांच्या बँक खात्यामध्ये हॅकिंग ॲक्टिव्हिटी झाल्याची भीती दाखवून त्यांना सिक्युअर सर्व्हिस देत असल्याचे भासवून त्यांच्याकडून डॉलर स्वरुपात रक्कम उकळल्याचे उघडकीस आले आहे.



या कारवाईत पोलिसांनी कॉल सेंटर चालवण्यासाठी लागणारे ११ लॅपटॉप, १२ मोबाईल फोनसह इतर साहित्य जप्त केले आहे.

नवीन पनवेल सेक्टर- ११ मधील एका रो-हाऊसमध्ये काही व्यक्तींकडून बनावट कॉल सेंटर चालवण्यात येत असल्याचे तसेच सदर कॉल सेंटरमधून मेझॉन पेलालच्या नावाने अमेरिकेतील नागरिकांना व्हीओआयपी कॉलद्वारे संपर्क साधून त्यांची फसवणूक करण्यात येत असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांच्या सुचनेनुसार गुन्हे शाखा युनिट-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर चासकर, फडतरे, पोलीस उपनिरीक्षक पाटील व त्यांच्या पथकाने सदर कॉल सेंटरवर छापा मारला होता.

या वेळी या रोहाऊसमध्ये १३ व्यक्ती ॲमेझॉन पेलालच्या नावाने बनावट कॉल सेंटर चालवत असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या चौकशीत सदर कॉल सेंटरमधील कर्मचारी तेथील कॉल सेंटरच्या माध्यमातून अमेरिकन नागरिकांना व्हीओआयपी कॉलद्वारे संपर्क साधून त्यांच्या बँक खात्यामध्ये हॅकिंग ॲक्टिव्हिटी झाल्याची भीती दाखवत होते.

तसेच त्याकरता एनी डेस्क हे सर्वर ॲप्लिकेशन डाऊनलोड करावे लागेल, असे सांगून त्यांना सिक्युअर सर्व्हिस देत असल्याचे भासवत होते. तसेच त्यांच्याकडून अमेरिकन डॉलर स्वरुपात गिफ्ट कार्ड स्विकारुन त्यांची फसवणूक करत असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी संगणक व सायबर तज्ज्ञांच्या माध्यमातून सर्व लॅपटॉपची तपासणी करून त्यातील सर्व डेटा ताब्यात घेऊन ११ लॅपटॉप, १२ मोबाईल फोनसह इतर साहित्य जप्त केले.

### खांदेश्वर पोलिसांकडून कसून चौकशी

**खांदेश्वर पोलिसांनी कॉल सेंटरचा मालक संदिप हरिश्चंद्र वाल्मिकी (वय ३२), मॅनेजर दुशांत चंद्रकांत गोरले (वय ३२) तसेच कॉल सेंटरमध्ये काम करणारे अशा एकूण १६ जणांना ताब्यात घेतले आहे. या टोळीने सदर कॉल सेंटरच्या माध्यमातून शेकडो अमेरिकन नागरिकांना लुबाडल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार खांदेश्वर पोलिसांकडून कसून चौकशी करण्यात येत आहे.**

---

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या खारघर शहर मंडलाच्या विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आहे. भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मान्यतेने आणि खारघर शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी मंडल कार्यकारणी जाहीर केली होती.

यामध्ये भाजपच्या खारघर मंडल सरचिटणीसपदी दीपक शिंदे, महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी साधना पवार, एनजीओ अध्यक्षपदी राजेंद्र मांजरेकर, सोशल मीडिया सेल अध्यक्षपदी अजय माळी, शिक्षक सेल अध्यक्षपदी संदीप रेड्डी नियुक्ती करण्यात आली होती.

या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन करुन पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी विधानसभा विस्तारक अमरीश मोकल, युवा नेते संदीप कासार, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करविषयक व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवार दिनांक २५ ऑक्टोबर सकाळी ११.०० वाजता वाणिज्य विभागातर्फे करविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून सीए कृष्णन जयकुमार विके कृष्णा मेनन महाविद्यालय मुंबई व प्रा. सय्यद अलीराजा सिंहगड महाविद्यालय मुंबई यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील व्यवसाय व्यवस्थापन शिक्षण विभागातील व वाणिज्य विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीना प्रत्यक्ष कर, कॉस्ट अकाऊंटिंग या दोन्ही विषयातील बारकावे याविषयी मार्गदर्शन केले याचाच फायदा येणाऱ्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून दोन्ही विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थाना होणार आहे. या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील दोन्ही विभागातील सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी उपस्थित राहून करविषयक व्याख्यानाचा लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना करविषयक मोलाचे मार्गदर्शन केले व व्याख्यानासाठी शुभेच्छा दिल्या.


या व्याख्यानाचे आयोजन प्राध्यापक डॉ. फारुक शेख (विभाग प्रमुख वाणिज्य शाखा) यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील,प्रा. डॉ. कविता शिंदे, प्रा. राहुल कांबळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

---

## करंजाडेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल नगर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने विजयादशमी उत्सव करंजाडेमध्ये मंगळवारी (दि. २४) साजरा करण्यात आला. या वेळी संघाच्या पारंपरिक पद्धतीने पथसंचलन काढण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.





प्रतिवर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघामार्फत दसऱ्याच्या दिवशी विविध ठिकाणी पथ संचलन निघते तसेच विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन सुद्धा केले जाते. पनवेल शहराला रा.स्व. संघाचा दैदिप्यमान इतिहास असल्याने मंगळवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथ संचलन शहरातील करंजाडे या वसाहतीतील सेक्टर ६ येथून सुरू झाले व करंजाडे मराठी शाळेजवळ सांगता झाली. दरम्यान ठिकठिकाणी नागरिकानी उत्स्फूर्तपणे संचलन मार्गावर रांगोळ्या काढून व ध्वजावर पुष्पवृष्टी करून स्वागत केले. तदनंतर शाळेच्या प्रांगणात शस्त्रपूजन व विजयादशमी उत्सव पार पडला.

करंजाडे सेक्टर ५ येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ हा उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत सेवा विभाग प्रमुख विवेक भागवत हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी बदलत्या काळातील आव्हाने, कणखर राष्ट्र भूमिका, शास्त्र व शस्त्र सज्ञतेचे महत्व इत्यादी विषयांवर त्यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने तरुण व ज्येष्ठ स्वयंसेवक उपस्थित होते त्याच बरोबर सर्वसामान्य नागरिक स्त्री पुरुषांची उपस्थितीसुद्धा लक्षणीय होती. या उत्सवात करंजाडे ग्रामपंचायतीतील पदाधिकारी,राजकीय मान्यवर व समाजातील इतर मान्यवर हेसुद्धा उत्सवात सहभागी झाले होते.

---









**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने आयोजित दुर्गामाता दौड या धार्मिक उपक्रमाची सांगता पनवेल परिसरात करण्यात आली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून दौडला सुरुवात झाली. यानंतर संपूर्ण पनवेलमध्ये फिरून दौडची सांगताही छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ झाली. या दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाले होते.**



**पनवेल : कोपर येथील जय साई शक्ती कला क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक मंडळाच्या वतीने विराजमान दसरा गणपतीचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, किशोर पाटील, साईचरण म्हात्रे, वैभव घरत, सुनील ठाकूर, संकेत म्हात्रे, मयुर पाटील, गणेश पाटील, तेजस पाटील, अमर घरत, संदेश म्हात्रे, सुहास भगत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : गव्हाण येथील दत्त प्रसादिक मंडळ देशमुख समाजाच्या वतीने विराजमान दसरा गणपतीचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, उषा देशमुख, जयवंत देशमुख, सुयोग देशमुख, अभिजित देशमुख, संदीप देशमुख, आकाश देशमुख, भाविक देशमुख आदी उपस्थित होते.**



**पनवेल : धनराज मित्र मंडळ, मोठापाडा, न्हावे खाडी यांच्या वतीने विराजमान दसरा गणपतीचे मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी उद्योजक सागरशेठ ठाकूर, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, अरुण ठाकूर, हरेश मोकल, शंभो ठाकूर, गोपीचंद ठाकूर, मदन ठाकूर, हरेश्वर कडू, विजय कडू, ध्रुव तांडेल, अनंता ठाकूर, जगदीश ठाकूर, ग्रामस्थ मंडळ मोठापाडा आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : सेक्टर १६ चा राजा या दसरा गणपतीचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, सुहास भगत, निलेश भगत, मीतेश भगत, सनी भगत, अनुप भगत, विजय भगत, उमेश घरत, राहुल भगत, प्रीतम भगत, रोशन घरत, प्रमोद भगत, मनोज शर्मा, केसरी पाल, रवी शिंगारे, रामदास मोरया, सुमित तिवारी, पूनम, सविता शिंगारे, विमला भगत, पटेल, संजीवनी बागल आदी उपस्थित होते.**





**पनवेल : दसरा सणानिमित्त येथील जय साई शक्ती कला क्रिडा, सांस्कृतिक व सामाजिक मंडळाच्या आणि गव्हाण दत्त मंदिरात विराजमान दसरा गणपतीचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी किशोर पाटील, संकेत म्हात्रे, मयुर पाटील, सुनील ठाकूर, प्रितम देशमुख, महिंद्र देशमुख, सौख्य देशमुख, जयवंत देशमुख आदी लोक उपस्थित होते.**

**त्वरीत जागा भरणे आहे**

एका नामांकित साडी शोरूमसाठी
लेखापालाची (अकाऊटंट) एक जागा भरणे आहे.
स्त्री/पुरूष असेल तर चालेल अनुभव असल्यास प्राधान्य...

संपर्क :- मो. ९०४९७७७५४४ / ८१०४२०७७९३

## संपादकीय

# खुद्दार विरुद्ध गद्दार

निवडणुकांच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, परंतु रणांगणाचे वेध मात्र लागले आहेत अशा अवस्थेत ठाकरे गटाची चांगलीच कुचंबणा झालेली दिसते. तारखा जाहीर न झाल्यामुळे निवडणुकीचा अजेंडा ठरवणे अनेक राजकीय पक्षांना जड जाते आहे. नेमके कुठल्या दिशेने प्रचाराचे गाडे पुढे रेटायचे याचा अंदाज अद्याप त्यांना आलेला दिसत नाही.

**दसर्‍याचा दिवस हा राजकारणासाठी जणु पर्वणीचा दिवस झाला आहे. विजयादशमीचा मुहुर्त साधून अनेक राजकीय पक्ष आपापले मेळावे आयोजित करत असतात. महाराष्ट्रात मंगळवारच्या दिवशी असे चार मोठे मेळावे पार पडले. नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दसरा मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून विख्यात संगीतकार आणि गायक शंकर महादेवन यांनी विशेष उपस्थिती दाखवली. रा. स्व. संघाच्या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध संचलन आणि सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रबोधनपर व्याख्यान. भागवत यांनी आपल्या व्याख्यानामध्ये देशाच्या प्रगतीचा आलेख अचूकपणे मांडला. द्वेषभावना नष्ट करायला हवी तसेच श्रीराममंदिराची उभारणी अयोध्येत पूर्णत्वास जात असताना एकसंघ लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्याकडे आपले विशेष लक्ष असायला हवे असे मनोगत त्यांनी मांडले. संघाचा मेळावा वगळता आणखी चार मेळावे महाराष्ट्रभर पार पडले, ते सर्वच्या सर्व तद्दन राजकीय स्वरुपाचे होते. यंदा पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील विचारांचे सोने वाटले! भगवान गडावरून भारतीय जनता पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी चढा सूर लावला. उरलेले दोन मेळावे शिवसेनेचे होते. दक्षिण मुंबईतील आझाद मैदान येथे भरलेल्या महाप्रचंड मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचा अस्सल विचार परखडपणाने मांडला. मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीमागे बव्हंशी शिवसैनिक उभे आहेत. त्यांना दिवसेंदिवस मिळणारे पाठबळ किती वाढत चालले आहे याचे प्रत्यंतर आझाद मैदानात जमलेल्या गर्दीवरून आले. तब्बल दोन लाख शिवसैनिक महाराष्ट्रभरातून आझाद मैदानाकडे लोटले होते. त्यांच्यासाठी खाण्यापिण्याचीदेखील चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारसरणीच्या पाठीत खंजीर खुपसणारे खरे महागद्दार आहेत, अशी गर्जना मुख्यमंत्री शिंदे यांनी करताच उपस्थित लाखो शिवसैनिकांनी जयजयकारानिशी त्यांना प्रतिसाद दिला. मराठा आरक्षणासाठी शरीरातील रक्ताच्या अखेरच्या थेंबापर्यंत लढेन अशी प्रतिज्ञा करताना मुख्यमंत्री शिंदे भावनिक झाले आणि लाखो शिवसैनिकांच्या साक्षीने त्यांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेसमोर मस्तक टेकविले त्याक्षणी सारे मैदान थरारून गेले होते. याच्या अगदी उलट चित्र शिवाजी पार्क येथील मेळाव्यात बघावयास मिळाले. उरल्यासुरल्या शिवसेनेचे मोजके नेते जमेल तशी निंदानालस्ती करण्याची हौस भागवून घेत होते. खुद्द ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भाषणातही नेहमीचा जोम दिसला नाही. तेच ते शब्द, त्याच त्या लाखोल्या आणि तेच ते आरोप! खंजीर, गद्दार, खोकेबहाद्दर असल्या शब्दांच्या पखरणीपलिकडे त्यांच्या भाषणात काहीच नवे नव्हते. हिंमत असेल तर एकत्र निवडणुका घ्या आणि आमच्याशी टक्कर घ्या असे आव्हान ठाकरे यांनी दिले खरे, परंतु त्याच्यात काहीच दम नव्हता. त्यांच्या गद्दार, खोकेबहाद्दर या सततच्या लाखोल्यांचा आता मतदारांनाच कंटाळा येऊ लागला आहे हे खरे. निवडणुका पार पडेपर्यंत हे आरोप-प्रत्यारोप सत्र चालूच राहणार यात शंका नाही.**

# महादेवाचा मुरा गावाला ग्रामपंचायत निर्मितीची ओढ





**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील अतिदूर्गम आणि अतिमागास लोकवस्त्यांना मूळप्रवाहात आणण्याचे प्रयत्न सरकार आणि राजकीय पातळीवर सुरू झाले तेव्हा ते त्या आदिवासी लोकवस्तीवरील उपकार ठरल्याचे दिसून आले. याचे कारण ठरले आहे या गावातील अर्धेअधिक लोक ज्या गावात मतदान करतान तेथील एक कुटूंब ज्यांनी राजकारण आणि रेशनदुकानाद्वारे गेल्या चार पिढयांपासून या गावावर सत्ता ठेवली आहे. तर दुसर्‍या गावाने केवळ मतदानाकरीता या गावातील मतदारांना विचारात घेतले आहे. महादेवाचा मुरा हे महादेव कोळी समाजाच्या लोकवस्तीचे गाव गेली अनेक वर्षे गोवेले आणि बोरघर या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागलेले असून लोकसंख्येचा आणि मतदारसंख्येचा निकष पाहता या महादेवाचा मुरा लोकवस्तीचे रूपांतर आता महसूली आदिवासी गाव आणि ग्रामपंचायत निर्मितीत होण्याची गरज आहे.

कोकणातील मुरा म्हणजे उंचावरील सपाटप्रदेश असलेला भूभाग. याठिकाणी अतिशय पुरातन असे महादेवाचे मंदिर असल्याने या गावाला महादेवाचा मुरा हे असे नांव पडले आहे. हे गाव बोरघर आणि गोवले या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागले गेले आहे. या गावातील समोरासमोरील ४० घरांच्या रांगा अशा प्रकारे दोन वेगवेगळया ग्रामपंचायतींमध्ये विभागल्याने या गावाला महसुली गावाचाही दर्जा मिळाला नाही. ब्रिटीश काळात या लोकवस्तीचा उल्लेख आदिवासी पाडा असा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला महाबळेश्वरचा ऑर्थर सीट पॉईंट, दुसर्‍या बाजूला कांगोरीगड आणि समोरच चंद्रगड तर नजरेच्या टापूत शिवछत्रपतींनी रूधीर तिलक लावून हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा घेतलेला रायरेश्वर मंदिराचा पाडाही दिसून येतो. काश्मीरमधील पहेलगामप्रमाणे बशीसारख्या या खोलगट भुभागात स्वच्छ सुर्यप्रकाश असताना सर्वच इतिहास अगदी साद घालताना दिसून येतो.

राजकीय आणि प्रशासकीय अनास्थेपोटी पोलादपूर तालुक्यातील महादेव कोळी समाजाची सर्वाधिक लोकवस्ती असलेले तालुक्यातील सर्वात दूर्गम पर्यटन क्षेत्र तीर्थक्षेत्र महादेवाचा मुरा हे गाव या गावापर्यंतचा रस्ता चार वर्षांपूर्वी पावसाळ्यात मधोमध दुभंगला जाऊन रहदारी बंद झाल्याने गेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार ग्रामस्थांनी एकजुटीने केला होता. अतिशय पुरातन असे महादेवाचे मंदिर असल्याने या गावाला महादेवाचा मुरा हे असे नांव पडले आहे. हे गाव बोरघर आणि गोवले या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागले गेले आहे. या गावातील समोरासमोरील ४० घरांच्या रांगा अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या ग्रामपंचायतींमध्ये विभागल्याने या गावाला महसुली गावाचाही दर्जा मिळाला नाही. ब्रिटीश काळात या लोकवस्तीचा उल्लेख आदिवासी पाडा असा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला महाबळेश्वरचा ऑर्थर सीट पॉईंट, दुसर्‍या बाजूला कांगोरीगड आणि समोरच चंद्रगड तर नजरेच्या टापूत शिवछत्रपतींनी रूधीर तिलक लावून हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा घेतलेला रायरेश्वर मंदिराचा पाडाही दिसून येतो. काश्मीरमधील पहेलगामप्रमाणे बशीसारख्या या खोलगट भुभागात लख्ख सुर्यप्रकाश असताना सर्वच इतिहास अगदी साद घालताना दिसून येतो.

उन्हाळयात तब्बल दोन-अडीच किमी पायपीट करून पाणी आणणार्‍या महिलांचा संसार अद्याप चुली कुंफ्कूनच चालला आहे. या गावाकडे गोवेले गावाकडून असलेला रस्ता सर्वांत जवळचा रस्ता असल्याने तो २००९ साली करण्यात आला. यावेळी रस्त्यामुळे पाणीटंचाईकाळात येणार्‍या पिकअपजीपची वाट पाहणारे आबालवृध्द सुखावले जात असत. अंगणवाडी, प्राथमिक शाळा येथून शिकलेली मुलं साखर आणि उमरठ येथील माध्यमिक शाळांमध्येही जात आता महाबळेश्वर, पाचगणी यासारख्या ठिकाणी नोकरीनिमित्त गेली आहेत. या पाडयावरील पारधी, सावंत, बुडले, कदम, झुंजार, वाघमारे, कोलपे, धानावले, टेकावले आदी आडनावाचे ग्रामस्थ पूर्वापार महादेव कोळी समाजाचे असूनही नोकरी उपजिविकेसाठी अन्यत्र स्थलांतरीत झाल्याने त्यांच्याकडे महादेव कोळी आदिवासी समाजाचे जातीचे दाखलेही नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे आदिवासींप्रमाणे या लोकवस्तीला रेशन धान्याचेही वाटप होत नाही. स्थानिक उपजिविका चक्क जंगलातील फळे विशेषत आंबे, फणस, काजू, बोरं, मध, वनौषधी विकून चालत आहे. या पाडयावरील सर्वाधिक वयोवृध्द महिला ९८ वर्षांची असून दात आणि आवाज शाबूत असलेली ठणठणीत प्रकृतीची आहे. साधारणपणे ३५० ते ४०० लोकसंख्या असलेल्या या महादेवाच्या मुरा लोकवस्तीमध्ये पशूधनही तब्बल तीनशेच्या आसपास आहे. अविकसित गावाचा विकास ही राजकीय पुढारी आणि ठेकेदारांच्या उत्कर्षाचे साधन असते त्यास महादेवाचा मुरादेखील अपवाद राहिला नाही. रस्ता, अंगणवाडी, शाळागृह, पाण्याच्या विहिरी अशा सुविधांसाठी येथे खर्च झालेल्या निधींपासून साकारलेल्या विकासकामांचा दर्जा सुमारच आहे.

येथे असलेल्या पावणेदोनशे मतदारांपैकी काहींना मतदानासाठी बोरघरला तर काहींना गोवेले येथे जावे लागत असल्याने येत्या विधानसभा निवडणुकीवेळी मतदानाला महादेवाचा मुरा उतरायचाच नाही, असा ठाम निर्धार महादेवाच्या मुरा येथील स्त्री-पुरूष मतदारांनी केला असता प्रशासनाला या इशार्‍याची दखल घ्यावी लागली होती. अद्याप या गावाला आदिवासी महसुली गावाचा दर्जा मिळाला नसून हे गांव बोरघर आणि गोवेले या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागलेले दिसून येत आहे. शिवकालीन गाव असलेल्या महादेवाचा मुरा या लोकवस्तीला पर्यटनाचा क दर्जा रायगड जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री ग्रामसामाजिक परिवर्तन अभियान अंतर्गत गोवेले ग्रामपंचायतीला संपर्क अधिकारी म्हणून उपस्थित राहताना विकासकामासाठी पोलिसांचा कधीही अप्रत्यक्ष सहभाग नसतानादेखील या अभियानामुळे तो आला आहे म्हणून ग्रामस्थांच्या सहभागाने पोलादपूर तालुक्यातील गोवेले ग्रामपंचायत येत्या वर्षभरात राज्यात आदर्शवत करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू, अशी ग्वाही रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अनिल पारसकर यांनी गावेले येथे दिली होती. मात्र, या मुख्यमंत्री ग्रामसामाजिक अभियानाचा उपयोग गोवेले येथील एकाच राजकीय खानदानाच्या चौथ्या पिढीने ठेकेदारीची कामे मिळविण्यासाठी केला आहे. २०२१च्या भुस्खलनामध्ये या गावाच्या रस्त्याच्या कामासाठी निविदा निघूनही चौथ्या पिढीच्या राजकारणी आणि ठेकेदाराने वर्चस्व दाखवित केलेल्या कामामुळे रस्त्यावरील पुलांच्या कामांमध्ये पुष्कळसे दोष दिसून येत आहेत. याच लोकवस्तीतील अर्धी मते ज्या बोरघर ग्रामपंचायतीमध्ये मतदानासाठी जातात त्यांनी यावर्षी महादेवाचा मुरा लोकवस्तीमधील व्यक्तीला सरपंचपदाची संधी दिली आहे. महादेवाचा मुरा गावासाठी रस्ता, पाणी, शिक्षण, आरोग्य, विद्युतपुरवठा, एस.टी. प्रवासी वाहतूक, पर्यटनविषयक रोजगार, रेशनदुकानदार तसेच अन्य सुविधा देण्यासाठी या लोकवस्तीला बोरघर आणि गोवेले या दोन्ही ग्रामपंचायतींपासून विभक्त करून आदिवासी महादेव कोळी समाजाची वस्ती असल्याने स्वतंत्र आदिवासी गावांचा दर्जा देण्यासोबत ग्रामपंचायत तयार केल्यास या लोकवस्तीचा विकास करण्याची संधी याच ग्रामस्थांना मिळू शकेल, अशी परिस्थिती दिसून येत आहे.




# जाणून घ्या, कोणता स्मार्टफोन ठरतो बेस्ट

सध्या अनेक मोबाइल उत्पादक कंपन्या आपले नवनवीन स्मार्टफोन्स भारतीय बाजारामध्ये लॉन्च करत आहेत. नुकतेच गुगलने आपली पिक्सेल ८ सिरीज व ॲपल कंपनीने आपली आयफोन १५ सिरीज लॉन्च केली आहे. गुगल पिक्सेल ८ सिरीजमध्ये गुगल पिक्सेल ८ आणि गुल पिक्सेल ८ प्रो या स्मार्टफोन्सचा समावेश आहे. तर आयफोन १५ सिरीजमध्ये आयफोन १५, आयफोन १५ प्लस, आयफोन १५ प्रो आणि आयफोन १५ प्रो प्लस या मॉडेल्सचा समावेश आहे. आज आपण गुगल पिक्सेल ८ आणि आयफोन १५ या दोन फोनमधील तुलना जाणून घेणार आहोत. दोन्ही फोनचे फीचर्स, किंमत आणि इतर स्पेसिफिकेशन्स याबद्दल अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

**डिझाइन आणि डिस्प्ले**

गुगल पिक्सेल ८ मध्ये ६.२ इंचाचा जडएऊ डिस्प्ले मिळतो.या डिस्पेलचा रिफ्रेश रेट १२० Hz इतका आहे. तर आयफोन १५ मध्ये ६.१ इंचाचा सुपर रेटिना XDR OLED डिस्प्ले वापरकर्त्यांना मिळतो. आयफोन १५ मध्ये डायनॅमिक आयर्लंडची सुविधा देण्यात आली आहे. पिक्सेल ८मध्ये आणि आयफोन १५ या दोन्ही फोन्सच्या डिस्प्लेमध्ये २००० नीट्स इतका ब्राइटनेस देण्यात आला आहे.

**कॅमेरा**

पिक्सेल ८ फोनमध्ये ५० मेगापिक्सलचा प्रायमरी कॅमेरा देण्यात आला आहे. ज्यामध्ये f/१.६८ अपर्चर असणारे सॅमसंग GN२ सेन्सर देण्यात आला आहे. पिक्सेल ८ मध्ये १२ मेगापिक्सलचा अल्ट्रा वाइड अँगलचा कॅमेरा, सोनीचा IMX३८६ सेन्सर मिळणार आहे. सेल्फी आणि व्हिडीओसाठी फोनमध्ये ११ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा मिळतो. आयफोन १५ मध्ये गुगलच्या फोनप्रमाणे AI चा सपोर्ट देण्यात आलेला नाही. यामध्ये ४८ मेगापिक्सलचा प्रायमरी कॅमेरा सेन्सर आणि १२ मेगापिक्सलचा अल्ट्रा वाइड लेन्स देण्यात आली आहे.

**बॅटरी आणि किंमत**

गुगल पिक्सेल ८मध्ये ४,५७५ mAh क्षमतेची बॅटरी मिळते. तसेच यामध्ये २७ Wचा चार्जिंग सपोर्ट देण्यात आला आहे. गुगल पिक्सेल ८ची किंमत ७५,९९९ रुपये व आयफोन १५ ची किंमत ७९,९०० रुपये इतकी आहे. गुगल पिक्सेल ८ मध्ये आयफन १५ पेक्षा अधिक जास्त क्षमतेची बॅटरी मिळते. तर आयफोन १५मध्ये ३,३४९ mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. यामध्येही २७ Wचा चार्जिंग सपोर्ट देण्यात आला आहे.

# गायक, संगीतकार हृदयनाथ मंगेशकर



**निमित्त**

असामान्य प्रतिभेचे गायक व संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांचा आज वाढदिवस. त्यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९३७ रोजी प्रख्यात गायकनट मास्टर दीनानाथ मंगेशकर व श्रीमती शुद्धमती ऊर्फ माई या दाम्पत्यापोटी पुणे येथे झाला. दीनानाथ यांच्या अपत्यांत हे सर्वांत धाकटे (पाचवे) अपत्य. भारतरत्न लता मंगेशकर या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गायिका या हृदयनाथांच्या सर्वांत ज्येष्ठ भगिनी होत तसेच गायिका आशा भोसले, मीना खाडीलकर व उषा मंगेशकर या त्यांच्या इतर मोठ्या भगिनीही संगीतक्षेत्रात प्रसिद्ध.

हृदयनाथांच्या बालपणीच दीनानाथांचे निधन (१९४२) झाल्याने त्यांना वडुलांचा फारसा सहवास व प्रत्यक्ष तालीम मिळाली नाही, पण वंशपरंपरेने आलेला संगीतवारसा, शास्त्रीय संगीताची उस्ताद अमीरखाँ यांच्याकडून घेतलेली तालीम, आपल्या समकालीन संगीतकारांच्या स्वररचनांचा हृदयनाथांनी केलेला अभ्यास व स्वतंत्र प्रतिभा यामुळे सुरुवातीपासूनच हृदयनाथांची एक वेगळी संगीतशैली आकारास आली. त्यांनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'निसदिन बरसात नैन हमारे' व 'बरसे बूंदिया सावन की' या भक्तिगीतांना स्वरसाज चढविला. ती गीते आजही रसिकप्रिय आहेत. संगीतकार सलील चौधरी यांना गुीणस्थानी मानणार्‍या हृदयनाथांना त्या वेळच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या संगीतकारांचा सहवास व काहींची मैत्री लाभली. त्यामुळे त्यांची मूळचीच वेगळी संगीतशैली अधिक विकसित व वैविध्यपूर्ण होत गेली. या शैलीमध्ये भारतीय शास्त्रीय संगीत, लोकसंगीत तसेच पाश्चिमात्य संगीत यांचा मिलाप होता. या शैलीने विशेषत: भावसंगीताच्या परंपरेला एक सुरेल छेद देऊन, रसिकांसमोर सुरांचे, लयीचे व भावांचे एक वेगळे प्रकटीकरण सिद्ध केले. कशी काळ नागिणी, चांदणे शिंपीत जाशी, तिन्हीसांजा सखे मिळाल्या, दे मला गे चंद्रिके, ये रे घना, जिवलगा राहिले दूर घर माझे, घनतमीं शुक्र राज्य करी, माझे गाणे, ही वाट दूर जाते अशी कित्येक गीते याचे उदाहरण म्हणून सांगता येतील.

हृदयनाथांच्या बहुसंख्य संगीतरचना या स्त्रीस्वरप्रधान आहेत व त्यांपैकी बहुसंख्य त्यांच्या गायिकाभगिनी लता मंगेशकर व आशा भोसले यांनी गायलेल्या आहेत. याशिवाय त्यांनी किशोरी आमोणकर, अनुराधा पौडवाल, पद्मजा फेणाणी, ज्योत्स्ना हर्डीकर, राधा मंगेशकर आदी गायिकांना आणि सुरेश वाडकर, महेंद्र कपूर, अरुण दाते, रवींद्र साठे आदी गायकांना आपल्या संगीत दिग्दर्शनात गाण्याची संधी दिली. त्यांनी अनिल मोहिले, अरुण पौडवाल, अमर हळदीपूर अशा अनेक संगीत-संयोजकांना त्यांच्या गाण्यातील संगतीच्या वाद्यमेळाचे अर्थवाही संयोजन करण्यास मार्गदर्शन केले. त्यांनी खासगी वाहिन्यांवरील संगीत स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे.

मराठी नाट्य-चित्रपटांत विनोदी अभिनेते म्हणून प्रसिद्ध झालेले दामुअण्णा मालवणकर यांची कन्या भारती या हृदयनाथांच्या पत्नी असून त्यांना आदिनाथ, वैजनाथ व राधा ही तीन मुले. पैकी राधा मंगेशकर या हृदयनाथांच्या मार्गदर्शनाखाली गायनक्षेत्रात आहेत.

हृदयनाथांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी 'हृदयेश आर्ट' (मुंबई) ही संस्था स्थापन केली असून (२०११) दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणवंत व्यक्तीला हृदयनाथ मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. उत्स्फूर्त व जातिवंत काव्यास स्वत:च्या तितक्याच अभिजात व वैविध्यपूर्ण स्वररचनांनी न्याय देत पं. हृदयनाथ यांनी एकूणच भावसंगीतास एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले हे नि:संशय.


**क्लिक...क्लिक...!**



**माणगाव : ताम्हाणी घाटात शेतीला सोन्यासारखी झळाळी आल्याने शेतकरी राजा सुखावला आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# धावपळीमध्ये वाढतोय स्ट्रेस, ही गोष्ट करा...




आजकालच्या जीवनात लोक मोठ्या प्रमाणात व्यस्त आयुष्य जगताना दिसतात. मग कामाचा ताणतणाव, आर्थिक परिस्थिती किंवा वैयक्तिक काही गोष्टी अशा अनेक गोष्टींमुळे लोकांवरती खूप स्ट्रेस असतो. तसेच सध्याच्या काळात लोक त्यांच्या कामांमध्ये खूपच बिझी असतात आणि कामाचा त्यांच्यावर ताण देखील असतो. कामाच्या तणावामुळे लोकांची खूप चिडचिड होते, तसेच याचा त्यांच्या शरीरावरती परिणाम देखील होताना दिसतो. आजकाल बहुतेक लोक स्ट्रेसमध्ये असतात आणि त्यांच्या स्ट्रेसचा परिणाम त्यांच्या शरीरातील हार्मोन्सवर होतो. मग काही लोकांचे पोट वाढणे, मधुमेह होणे किंवा डिप्रेशन येणे अशा अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो.

स्ट्रेस कमी करण्यासाठी नेहमी हसत राहिलं पाहिजे. हसल्यामुळे आपल्या शरीरात हॅप्पी हार्मोन्स तयार तयार होतात जे आपलं डोकं शांत करण्यास मदत करतात. त्यामुळे प्रत्येकाने नेहमी आनंदी राहायला पाहिजे, हसत राहिलं पाहिजे. तसंच तुम्हाला तुमचा स्ट्रेस कमी करायचा असेल तर नेहमी कॉमेडी चित्रपट बघा, जोक्स वाचा यामुळे तुम्ही नेहमी हसत राहाल.

जर तुम्हाला तुमचा स्ट्रेस कमी करायचा असेल तर मेडिटेशन करणं खूप गरजेचे आहे. मेडिटेशन केल्यामुळे तुमच्या मनाला शांती मिळते. तसेच तुमचा स्ट्रेस कमी होण्यास मदत होते, लठ्ठपणा, मधुमेह अशा अनेक समस्यांपासूनदेखील सुटका मिळवण्यास तुम्हाला मदत होते. त्यामुळे मेडिटेशन करणे खूप गरजेचे आहे.

जेव्हाही तुमच्यावर जास्त प्रमाणात स्ट्रेस असेल अशावेळी एकटे राहू नका. एकटे राहिल्यामुळे मनात नकारात्मक विचार येतात यामुळे आणखीन तुमचा ताणतणाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे नेहमी आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत, परिवारासोबत हसत खेळत राहा यामुळे तुमचा स्ट्रेस कमी होण्यास मदत होईल.

जेव्हा तुमच्यावरती खूप ताणतणाव असेल तेव्हा तुमच्या शरीराला आराम देणं खूप गरजेचं असतं. त्यामुळे कितीही स्ट्रेस असला तरी स्वतःला वेळ द्या, आराम करा. शरीराला आराम दिल्यामुळे तुमच्या मनाला शांती मिळते आढि तुमचा स्ट्रेस कमी होण्यास मदत होते.

# धाटाव एमआयडीसीत रुग्णालयासाठी प्रस्ताव पाठवणार

## पालकमंत्री उदय सामंत यांचे आश्वासन; विश्रामगृहाचे भूमिपूजन





**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रात फायर ब्रिगेडसाठी गाडीची मागणी आमदार अनिकेत तटकरे यांनी केली आहे. येत्या दोन दिवसात हा प्रस्ताव तयार करण्यात येईल. बायपास रेडचे काम करण्यात येईल. रस्त्यावर प्रकाश योजनाही करण्यात येईल. औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांनीही पर्यावरण समतोल राखण्याचा काम केले पाहिजे. औद्योगिक क्षेत्रातील परिसर यापुढे चकाचक राहाणार असून यासाठी निधी देण्यात येईल. आदिती तटकरे मंत्री असताना एएसआयमधून धाटाव औद्योगिक क्षेत्रात रुग्णालयाची मागणीचे ठराव केले होते. आता हे काम होणार असून धाटाव औद्योगिक क्षेत्रातील आठ हजार स्क्वेअर मिटर जागा कामगार रुग्णालयासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवणार असल्याचे आश्वासन रायगडचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी औद्योगिक क्षेत्रात नवीन विश्रामगृहाच्या भूमिपूजनावेळी दिले.

या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, आमादार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, शिवसेना तालुका प्रमुख मनोजकुमार शिंदे, उपतालुकाप्रमुख संदेश मोरे, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, सरपंच नितीन वारंगे, विकास पाटील, अशिष स्वामी आदी उपस्थित होते.

ना. आदिती तटकरे यांनी, उद्योगमंत्री उदय सामंत यांचे धाटाव औद्योगिक क्षेत्रात मूलभूत काम केल्याबद्दल आभार मानत एएसआयच्या माध्यमातून रुग्णालयासाठी प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्याची विनंती केली. रुग्णालयासाठी प्रस्ताव मी



पाठवले होते. रायगड जिल्ह्यात रोहा, पेण, महाड व तळोजा येथे रुग्णालय आवश्यक आहे. त्यासाठी तीन प्राथमिक स्वरुपात प्रस्ताव पाठवले. त्याला मान्यता मिळावी व सुविधा उपलब्ध झाली, तर आरोग्याच्या दृष्टीने चांगले ठरणार आहे. भुवनेश्वर ते किल्ला या रस्त्याला मंजुरी मिळाल्यास ग्रामीण भागात सुविधा निर्माण होईल, असे सांगितले.

प्रकाश चव्हाण यांनी, १९७४ साली एमआयडीसीला सुरुवात झाली. २४४ हेक्टरवर पसरलेले हे क्षेत्र आहे, असे सांगितले.

# महाड शहरामध्ये दोन गटांत हाणामारी

## परस्परविरोधी तक्रारी दाखल

**महाड : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवादरम्यान महाडमधील सरेकर आळी येथे दोन गटात हाणामारी झाली. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील सरेकर आळी येथे नवरात्रोत्सवादरम्यान मंगळवारी (दि.२४) दोन गटात हाणामारी झाली. सिद्धी रोहित पवार (वय २९) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सरेकर आळी येथील पंकज प्रमोद उमासरे आणि पवन प्रमोद उमासरे या दोघा भावांचे भांडण सुरू असताना फिर्यादी यांचा दीर मिहीर भांडण सोडवण्यास गेला. त्या वेळी मिहिरला मारहाण व शिविगाळ करण्यात आली. त्याचप्रमाणे फिर्यादी यांची सासू यादेखील गेल्या असता पंकज याने त्यांच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. याप्रकरणी पंकज उमासरे यांच्या विरोधात भादंवि. कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच प्रकरणी नयना पंकज उमासरे (वय २६) यांनीदेखीलविरोधी तक्रार दाखल केली आहे. यातील रोहित पवार, मुकुंद भऊड, पवन भऊड, साहिल भऊड, मिहीर सतेरे, सुरेश पवार यांच्यावर मारहाण प्रकरणी भादंवि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३५४, ३२४, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही परस्परविरोधी तक्रारींचा तपास महान शहर पोलीस निरीक्षक खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शेलार या करीत आहेत.

# नियमित नोकरीत समायोजनासाठी कंत्राटी परिचारिका एकवटल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्तीवर असलेल्या कंत्राटी परिचारिकांनी नियमित नोकरीत समायोजन करून घ्यावे यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या परिचारिकांनी निदर्शने केली. रायगड जिल्ह्यातील १०० परिचारिका या आंदोलनात सहभागी झाल्या आहेत.

राष्टीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्ती करण्यात आलेल्या कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वयाची अट शिथील करून



नियमित नोकरीत समायोजन करून घ्यावे ही त्यांची प्रमुख मागणी आहे. आयटक सलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते कंत्राटी नर्सेस युनियनच्या माध्यमातून जिल्ह्यातील १०० परिचारिका या आंदोलनात सहभागी झाल्या. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी कामबंद ठेऊन आंदोलनाला सुरुवात केली. संघटनेच्या वतीने १६ ऑक्टोबर रोजी नागपुरच्या संविधान चौकात आंदोलन करण्यात आले होते.

यानंतर १७ ते २३ ऑक्टोबर दरम्यान राज्यभरात या मागणीसाठी राज्य सरकारला निवेदन देण्यात आले होते. आता पुन्हा एकदा शासनाचे लक्ष वेधण्यासाठी एकवटल्याचे संघटनेच्या जिल्हाध्यक्ष कृपाली पाटील आणि उपाध्यक्ष हेमलता पांडव यांनी सांगितले.

# महाडमध्ये उद्या निधी आपके निकट कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी आपके निश्चत – २.० भविष्य निर्वाह निधीचे सदस्य, नव्याने अंतर्भूत असलेल्या संस्था आणि पेन्शनधारकांसाठी सुरू आहे. या वेळी पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना प्रादेशिक कार्यालय यांनी महाड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, पी–४३, एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, महाड येथे शुक्रवारी (दि. २७) होणार आहे.

या कार्यक्रमात खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे यावे लागू नये म्हणून पीएफ, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतन यासंबंधीच्या तक्रारी ऐकून घेतल्या जातील. याशिवाय, नवीन समाविष्ट आस्थापनांच्या नियोक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शन देखील प्रदान केले जाईल. प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान म्हणाले की, सध्या निधी आपके निश्चितची व्याप्ती वाढवण्याच्या प्रक्रियेत निधी आपके निकट २.० आणले आहे.

या कार्यक्रमात नोडल अधिकाऱ्यांकडून समस्या ऐकून घेऊन त्याचे निराकरण केले जाईल. एझत्रऋ नियोक्ते आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होऊ शकतात आणि त्यांच्या समस्या जागेवर सोडवू शकतात.

# मुरूडमध्ये सरपंचपदाचे १७, तर सदस्यपदाचे ७६ अर्ज मागे

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील १५ ग्रामपंचायत निवडणुकीत सदस्यपदाकरिता ३५४ तर सरपंचपदाकरीता ५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवारी (दि. २५) सरपंचपदाकरीता १७ तर सदस्यपदाकरिता ७६ अर्ज मागे घेण्यात आले आहे.

शिघ्रे ग्रामपंचायतीत सदस्यपदाकरिता सात तर सरपंचपदाकरीता एक अर्ज मागे घेण्यात आला. भोईघरमध्ये सदस्यपदाकरिता दोन तर सरपंचपदाचे तीन अर्ज मागे घेण्यात आले. वळके ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाचा एक उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला. साळावमधून सदस्यपदाकरिता नऊ तर सरपंचपदाकरीता दोन उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. विहूर ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाचा एक अर्ज मागे घेण्यात आला. तळेखारमधून सदस्यपदाकरिता तीन तर सरपंचपदाचा एक उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला.राजपुरीमधून सदस्यपदाचे दोन तर सरपंचपदाचा एक उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला. बोर्लीमधून सदस्यपदाचे १८ तर सरपंचपदाचा एक अर्ज मागे घेण्यात आला. चोरढेमधून सदस्यपदाचे पाच तर सरपंचपदाचे दोन उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. मिठेखार ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाचे ११ अर्ज मागे घेण्यात आले.

नांदगाव ग्रामपंचायतमधून सदस्यपदाचे सात तर सरपंचपदाचे चार उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. आगरदांडा ग्रामपंचायतमधून सदस्यपदाकरिता सहा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले आहेत. मांडलामधून सदस्यपदाकरिता चार तर सरपंचपदाचे दोन अर्ज मागे घेण्यात आले. काशिद, एकदरा या ग्रामपंचायतीमधून एकही उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला नाही.

# मध्य रेल्वे चालवणार ६० उत्सव विशेष ट्रेन

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस – थिवि/नागपूर आणि दानापूर दरम्यान अतिरिक्त ६० उत्सव विशेष ट्रेन चालवणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस–नागपूर द्विसाप्ताहिक विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २६ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर (११ फेऱ्या)पर्यंत दर मंगळवार आणि गुरुवारी ८.१५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १०.२५ वाजता पोहचेल. या गाडीसाठी ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, शेगाव, अकोला, बडनेरा, वर्धा आणि नागपूर हे थांबे देण्यात आले आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस–थिवि त्रि–साप्ताहिक गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १ ते २९ नोव्हेंबर (१३ फेऱ्या) दर शनिवार, सोमवार आणि बुधवारी १०.१५ वाजता सुटेल आणि थिविम येथे दुसऱ्या दिवशी १० वाजता पोहोचेल. या गाडीसाठी ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवि हे थांबे देण्यात आले आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस– दानापूर साप्ताहिक सुपरफास्ट स्पेशल लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २८ ऑक्टोबर ते २ डिसेंबर (सहा फेऱ्या) दर शनिवारी १२.१५ वाजता सुटेल आणि दानापूर येथे दुसऱ्या दिवशी ५ वाजता पोहोचेल. ही गाडी कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, पिपरिया, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पं. दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा आणि दानापूर या गाड्यांना या स्थानकांवर थांबेल देण्यात आले आहे.



**श्रीवर्धन : बोर्लीपंचतन येथील दुर्गादेवी तसेच दसऱ्याचा गणपती यांची मोठ्या उत्साहात गुलालाच्या उधळणीत निघालेली विसर्जन मिरवणूक.** (छाया : अमेय नाझरे)

# नागावमध्ये बिबट्या असल्याचा संशय

**अलिबाग** : नागाव येथील शास्त्रीनगर–समीरा परिसरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास बिबट्या दिसल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरली आहे. समीरा परिसरात मंगळवारी रात्री एक ते दोन वाजण्याच्या सुमारास बिबट्या असल्याचे रात्रीपासून सोशल मिडीयावर व्हायरल झाले आहे. अलिबागचे वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांच्या ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

# वेध सह्याद्रीची दुर्गामाता दौड उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

वेध सह्याद्रीतर्फे दसऱ्याचे औचित्य साधून अखंडित १० वर्षांपासून दुर्गामाता दौडचे आयोजन करण्यात येत असते. त्याच अनुषंगाने यंदाही दसऱ्यानिमित्त दुर्गामाता दौडचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील काटरंग ते पाटणकर चौक मार्गावर या दौडचे आयोजन करण्यात आले होते.

दौडीच्या सुरुवातीला काटरंग चौक येथे भगव्या ध्वजाचे व शास्त्रांचे पूजन करून दौडीला प्रारंभ करण्यात आला. काटरंग, जेसल ग्रिन्स, मोगलवाडी, भानवज, वर्धमान नगरमार्गे स्पूर्तीगीतांचा जयघोष करतपाटणकर चौक या ठिकाणी देवीचा गोंधळ घालून दौडीची सांगता करण्यात आली.

दौडमध्ये शहरातील निवृत सैन्य अधिकारी, लहान मुले यांच्यासह माहिला वर्ग व वयोवृद्धांचादेखील मोठ्या प्रमाणात सहभाग पहायला मिळाला.

मार्गातील प्रत्येक गावात दुर्गामाता दौडीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे ऊसर्ली बु., ता पनवेल, जि. रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेली ताबेकब्जातील तसेच मालकि हक्काची खुद्द स्वरुपाची खालील वर्णनाची शेत जमिन आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे– ऊसर्ली बु, ता. पनवेल, जि. रायगड**

| कब्जेदाराचे/ मालकाचे नाव | स.न/हि.न | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू./पै |
|---|---|---|---|
| सौ. कुंदा सुरेश पाटील<br>सौ. रंजना नरेश पाटील | ४०/५ | ०.०७.१०<br>पो.ख. ०.०१.००<br>एकूण ०.०८.१० | ०१.०० |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, एम. ओ. यु.फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज ,ॲटजमेंट, लीज, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवुन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा, वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजुन आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकती, तक्रारी दावे आमच्या अशिलांवर बंधनकारक राहनार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दि. २५/१०/२०२३**

**सही/–**
**ॲड. रोशन कचेर पाटील**

**ऑफिस : ००६, ए विंग, पहिला माळा,यशोकिरण सोसा. सावरकर चौक पनवेल, ४१०२०६**



## Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel.

- Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College New Panvel (W) (Autonomous)
- Ramsheth Thakur College Of Commerce & Science Kharghar (Self Finance)
- Bhagubai Changu Thakur College Of Law New Panvel (W) (Self Finance)

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE ASST. PROFESSORS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024 ONLY**
**All POSTS ARE ON SELF FINANCIAL PROGRAMS**

(On Purely Temporary basis for one year for the following subjects)

| Sr. No. | NAME OF THE INSTITUTE | SUBJECTS | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|
| 01 | Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College New Panvel (W) (Autonomous) | Commerce | M.Com With Net/Set/Ph.D. | 01 |
| | | Organic Chemistry | M.Sc. (Organic Chemistry) With Net / Set / Ph.D. | 01 |
| | | English | M.A.(English) With Net /Set / Ph.D. | 01 |
| | | Mathematics | M.Sc. (Mathematics) With Net / Set /Ph.D. | 01 |
| | | Zoology | M.Sc. (Zoology) With Net / Set /Ph.D. | 01 |
| | | Principal's Secretary & Data Operator | B.SC (IT) \ B.Sc. Computer Science having experience of maintaining the Website | 01 |
| | | Training & Placement Officer | M.B.A. / M.M.S. / HR or Equivalent having an experience in Training and Placement | 01 |
| 02 | Ramsheth Thakur College Of Commerce & Science Kharghar (Self Finance) | B.M.S. Marketing & HR Specialization | M.COM / M.M.S./ M.B.A. with Net / Set / Ph.D. | 02 |
| | | IT \ CS | M.Sc. (Computer Science) IT / MCA. with Net / Set / Ph.D. | 03 |
| 03 | Bhagubai Changu Thakur College Of Law New Panvel (W) (Self Finance) | LL. B (UG) | LL.M with Net / Set / Ph.D. | 01 |
| | | LL.M (PG) | LL.M With NET/SET/ Ph.D | 03 |
| | | Logic and Sociology (CHB Basis) | M.A. (LOGIC) with Net /Set/Ph.D. M.A. (SOCIOLOGY) with Net \ Set \ Ph.D. | 02 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach with attested xerox copies of certificates to **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot No: 8, Sector-14, New Panvel, Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai. 410206.**

Candidates may submit the application by email to principal@ckthakurcollege.net **or by Post** on or before **10th November 2023.** If required **Contact : MR. PRALHAD THAKUR, Mob. - 9022600288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur** (Ex- M.P.)
CHAIRMAN
Janardan Bhagat Shikdhn Prasarak Sanstha Panvel

# विमानतळाला 'दिबां'चे नाव मिळणे भूमिपुत्रांचा सन्मान -आमदार नाईक

## नवी मुंबईत दि.बा. पाटील चळवळ स्पर्धेतील विजेत्यांचा गुणगौरव

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नांव मिळणार हा स्थानिक आणि संपूर्ण भारतातील प्रकल्पग्रस्त, कामगार, कष्टकरी, भुमीपुत्रांचा सन्मान असणार आहे, असे मत माजी मंत्री आमदार गणेश नाईक यांनी व्यक्त केले. ते नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचा पाचवा वर्धापन दिन वाशी मध्ये मोठ्या उत्साहात झाला. या वेळी ते बोलत होते.



लोकनेते दि. बा. पाटील स्फूर्तीस्थान या चळवळ स्पर्धेच्या माध्यमातून दिबांचे कार्य साहित्य व कला स्वरुपात सादर केलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सन्मान सोहळा माजी मंत्री आमदार गणेश नाईक, दि. बा. पाटील नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, 'दिबां'चे सुपुत्र अतुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

केंद्र व राज्याच्या विविध सरकारी योजनांचा लाभ थेट नवी मुंबईतील नागरिक लाभार्थ्यांना मिळावा यासाठी दिवंगत करसन भगत शासकीय योजना केंद्राचे उद्घाटनदेखील गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी बोलताना नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांनी सांगितले की, दि. बा. पाटील ऊर्जास्थान स्पर्धेत १२ हजारांहुन अधिक संख्येने सर्वसामान्य नागरिक तसेच शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व विविध कला क्षेत्रातील कलावंतांनी सहभाग घेतला आहे व अद्यापही स्पर्धाकांचे अर्ज येत असल्याने त्यांस प्रोत्साहन आणि आशीर्वाद देऊन अधिक स्पर्धकांनी सहभाग घेण्याचे आवाहन पुन्हा करण्यात आले.

दि. बा. पाटील चळवळ स्पर्धेला मिळत असलेला वाढता उस्फुर्त प्रतिसाद लक्षात घेता यातील चित्रकला, लेख, स्फूर्तिगीत लेखन, ऑडिओ, व्हिडीओ, दि. बा. पाटील साहेबांचे दुर्मीळ फोटो (अल्बम), वृत्तपत्र कात्रणे (न्यूज पेपर कटींग), चित्रीकरण ( व्हिडीओ शूटिंग) दि. बा. पाटील साहेबांचे हस्तलिखित पत्र, दि बां च्या आंदोलन व संघर्षांवर माहितीपट स्पर्धा, शॉर्ट फिल्म आदि साहित्य व कला स्वीकारण्याची अंतिम तारीख वाढवून ती २० डिसेंबर २०२३ पर्यंत करण्यात आली असल्याचे दशरथ भगत यांनी बोलताना स्पष्ट केले.

लोकनेते दि. बा. पाटील यांचा समाजपट, त्यांचे कार्य, त्यांची तळमळ, चळवळ लोकांसमोर आणण्यासाठी दशरथ भगत यांनी आपला वाढदिवस झाकून ठेवला व सर्वांगीण समाजसेवेचा आदर्श आज सर्वांसमोर दाखवला. आजवर जी जी आंदोलने दशरथ भगत यांनी केली ती सर्व आंदोलने यशस्वी करून दाखवताना त्यांनी आपल्यातील अष्टपैलू नेतृत्वगुण सिद्ध केला आहे. मी दशरथ भगत यांच्या पाठीमागे कायम उभा आहे. दि. बा. चळवळ स्पर्धा अनोखी असून नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नांव मिळणार हा स्थानिक आणि संपूर्ण भारतातील प्रकल्पग्रस्त, कामगार, कष्टकरी, भुमीपुत्रांचा सन्मान असणार आहे, असे मत माजी मंत्री आमदार गणेश नाईक यांनी बोलताना व्यक्त केले.

नवी मुंबईतील विविध सामाजिक संस्थांना उचित मदत करणे, स्वच्छ भारत अभियानास सहाय्य म्हणून शून्य कचरा योजना कार्यान्वित करणे, त्यात प्रामुख्याने स्वच्छ भारत अभियानात कार्यरत असणारे सफाई कर्मचारी व कचरा वेचक महिला घटक आदींचा विशेष सन्मान वर्धापन दिन सोहळ्यात करण्यात आला.

या वेळी दि. बा. पाटील चळवळ स्पर्धेच्या संयोजन समितीतील रवींद्र वाडकर, प्रशांत निगडे, किशोर पाटील, प्रवक्ते शैलेश घाग, डॉ. विवेक भोईर, सुधाकर लाड, गजानन म्हात्रे, रामनाथ म्हात्रे, तेजस पाटील, नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे पदाधिकारी संजय यादव, देवेंद्र खाडे, फशीबाई भगत, वैजयंती भगत, संदिप भगत, रामेश्वरद्याल शर्मा, हे उपस्थित होते.

या सोहळ्यास माजी आमदार संदीप नाईक, अर्जुनबुवा चौधरी, जेष्ठ पत्रकार विश्वरथ नायर, अखिल भारतीय लेवा पाटीदार समाजाचे विश्वस्त महादेव वावीया, कामगार नेते भूषण पाटील, लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ नामकरण समितीचे संतोष केणे, विनोद म्हात्रे, शेतकरी प्रबोधिनीचे अध्यक्ष तथा संघर्ष नेते राजाराम पाटील,जेष्ठ कायदेतज्ञ ऍड. अजित येरुणकर, कामगार नेते सुरेश पाटील, गायक जगदीश पाटील, डॉ. आर एन पाटील, प्राचार्य शुभदा नायक, डॉ. पी जी पवार, अरुण घाग, एम जी म्हात्रे, सुजाता बल्लाळ, बी बी साळुंखे, नाथा नाईक, सूरदार राऊत, सुभाष ठाकूर, कारंडे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

**वेबसाईटचे उद्घाटन**

लोकनेते दि. बा. पाटील ऊर्जास्थान या स्पर्धे तील स्पर्धकांना स्पर्धेबाबत सखोल आणि परिपूर्ण माहिती सहज प्राप्तीसाठी www. dashrathbhagat.com या वेबसाईटचे उद्घाटन लोकनेते गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

# नवी मुंबईत बांगलादेशींवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबईतील कोपरखैरणे भागात बेकायदा राहणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या चारही लोकांच्या कडे भारतीय नागरिक असल्याचा कुठलाही पुरावा नव्हता. ही कारवाई मुंबई दहशदवाद विरोधी पथकाने केली आहे.

कमाल रियाज चौधरी, (मुळ गाव: पोस्ट पिरौली, थाना- कालिया, जिल्हा नराइल, देश बांगलादेश) कामरुल कलाम चौधरी, (जिल्हा नराइल, देश बांगलादेश) सोहेल अफसर खान, (पोस्ट पिरोली, थाना- कालीया, जिल्हा नराइल, देश बांगलादेश आलमगीर ओली कियारा शेख, ( देश बांगलादेश ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

मुंबई नागपाडा दहशदवाद विरोधी पथकाला नवी मुंबईतील कोपरखैरणे भागात बांगलादेशी नागरिक राहत असून भारतात त्यांनी अवैध मार्गाने प्रवेश केला असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे नवी मुंबई युनिट यांची मदतीने कारवाई करण्याकरीता सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय देवडीकर, रविंद्र उतेकर, तसेच पथकाने मतिन पटेल चाळ व अकिल पटेल चाळ, सेक्टर १२ ई, बोनकोड, खैरणे गाव, नवी मुंबई येथे धाड टाकली.

आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांनी अवैधरित्या भारतात प्रवेश केल्याची कबुलीही दिली. या सर्वांवर पारपत्र कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

# करंजाडेत पोलीस चौकीची निर्मिती

## आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे परिसराचा वाढत विस्तार आणि लोकसंख्या पाहता या ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीने पोलीस चौकी उभारणे गरजेचे होते व हे काम लोकसहभागातून येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केल्याने याचा फायदा येथील नागिरकांना निश्चितच होईल असे मत पोलीस उपायुक्त परिमंडळ-२चे उपायुक्त पंकज डहाणे यांनी पोलीस चौकीच्या उद्घाटन प्रसंगी केले.



दरम्यान, या पोलीस चौकीच्या नूतनीकरणासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन येथील कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

या उद्घाटनावेळी पोलीस उपायुक्त परिमंडळ-२चे उपायुक्त पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, करंजाडे सरपंच मंगेश शेलार, पोलीस पाटील कुणाल लोंढे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक कामत, सहाय्यक पोलीस निरीक्षक खरात, पोलीस उपनिरीक्षक दाभाडे, पोलीस उपनिरीक्षक चौगुले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमंत अहिरे आदींसह इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लोकनेते दि.बा.पाटील यांची आकर्षक रांगोळी



**नवी मुंबई : येथील पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त वाशी येथील सिडको हॉलमध्ये प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व.दि.बा.पाटील यांची दहा फूट लांब व चार फूट रुंद या आकारातील भव्य, चित्तवेधक रांगोळी रयत शिक्षण संस्थेचे नावडे शाखेतील कलाशिक्षक मंगेश खुटारकर यांनी साकारली.**

**पनवेल : परिसरामध्ये नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या अनुषंगाने काळुंद्रे, भिंगारी, तक्का गाव व कॉलनी परिसरातील देवींचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत आदींनी दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी देवीकडे सर्वांना सुखी, समाधानी व आरोगदायी ठेव अशी प्रार्थना करण्यात आली.**





# सारडे येथे स्वच्छता जनजागृती रॅली

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील सारडे येथे बुधवारी (दि. २५) स्वच्छता जनजागृती रॅली जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून काढण्यात आली तसेच कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्रशिक्षिका कलावती घरत यांनी कचरा व्यवस्थापन या विषयावरती मार्गदर्शन केले.





कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कल्पना म्हात्रे यांनी स्वच्छ्तेची शपथ दिली. जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असतांना 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रियपणे सुरू आहे.

स्वच्छता जनजागृती रॅली या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका कलावती घरत, जयश्री मोकल व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत स्वच्छता जनजागृती रॅली हा कार्यक्रम उत्साहात झाला.



**उरण : पाले येथील मच्छिंद्र सुरेश म्हात्रे यांच्या घरात विराजमान दसरा गणपती.**

# पालखी पदयात्रा सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील बोरी (पाखाडी) येथील श्रद्धा सबुरी पदयात्रा मंडळ उरण (बोरी) यांच्या वतीने सालाबादप्रमाणे श्री साई मंदिर उरण (बोरी) ते श्री क्षेत्र शिर्डी येथे पालखी पदयात्रा सोहळा होणार आहे. शुक्रवार (दि. २७) ऑक्टोबर ते शनिवार (दि. ४) नोव्हेंबर या कालावधीत पालखी पदयात्रा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या पालखी शुक्रवार (दि. २७) ऑक्टोबर रोजी श्री साई मंदिर (बोरी) उरण येथून सुरुवात होणार आहे.

अधिक माहिती साठी धनंजय भोरे ९८३३०५२६२७, दीपक थळी ९३२३४२५८९६ व सुरेश अय्यर (अण्णा) ८८७९२५३३४४ संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# 'विस्टा'तर्फे सामाजिक संस्थेस आर्थिक मदत

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीमधील विस्टा फुड्स कंपनीने सीएसआर फंडातून परिसरातील संस्थांसाठी आर्थिक मदतीची परंपरा कायम ठेवत रुग्णसेवेसाठी पनवेलच्या पटवर्धन हॉस्पिटलला तीन लाखांची आर्थिक मदत दिली आहे.

२०१८पासून सातत्याने विस्टा कंपनीतर्फे पटवर्धन हॉस्पिटलमध्ये डायलिसिसचे उपचार घेणाऱ्या गरजू रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्यात येते. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व एम.डी. भूपिंदर सिंग व कंपनीचे व्यवस्थापन सल्लागार चंद्रशेखर सोमण यांनी रुग्णालयाचे कार्यवाह राजीव समेळ व प्रशासकीय अधिकारी सुनील लघाटे यांच्याकडे सदर ३ लाखांचा धनादेश सुपूर्द केला. तसेच पनवेलमधील गुळसुंदे येथील गाडगीळ गुरुजी सामाजिक संस्थेला आदिवासी समाजातील रुग्णसेवेसाठी रुपये दोन लाखांचा धनादेश कंपनीतर्फे देण्यात आला.

या वेळी विस्टा कंपनीचे एम.डी. भूपिंदर सिंग तसेच कंपनीचे व्यवस्थापन सल्लागार चंद्रशेखर सोमण यांनी दोन्ही संस्थांच्या कार्याचे कौतुक केले. या दोन्ही संस्थांनी कंपनीच्या या सामाजिक जणीवेसाठी कृतज्ञता व्यक्त केली आहे. या कार्यक्रमासाठी विस्टा कंपनीचे तळोजा येथील प्लांट हेड प्रवीण ठाकूर एच.आर. डिपार्टमेंटच्या इंद्रायणी मॅडम व अधिकारी प्रथमेश पाटील, प्रोडक्शन मॅनेजर अमोल खुणे, कमर्शियल मॅनेजर अमित बापट यांच्यासह इतर अधिकारी व मॅनेजर उपस्थित होते.



## निवडक

### अलिबागेत स्वच्छतेसाठी श्रमदान



**अलिबाग** : शहरातील एकदंत नगर येथे स्वच्छता श्रमदान हा कार्यक्रम जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातून मंगळवारी (दि. २४) साजरा करण्यात आला. या वेळी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून एकदंत नगर परिसर व सार्वजनिक शौचालय स्वच्छ केले. संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात आला. या वेळी संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे, अकाउंट मॅनेजर प्रतीक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, कर्मचारी रिद्धी पाटील, प्रांजल पाटील, अजय पाटील, दिपंकर राउळ, नवनाथ पोईलकर, भारती पोईलकर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### खरवलीमध्ये करिअर मार्गदर्शन



**महाड** : संस्कारधाम विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये इ. आठवी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या वेळी भारतीय सैन्यदलातील निवृत्त (कॉर्पस ऑफ सिग्नल्स-आयटी अँड कम्युनिकेशन) प्रदीप फाळके यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत या दोन गोष्टींना जीवनात प्राधान्य दिल्यास आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल असा सल्ला दिला. एनडीए, स्पर्धा परिक्षा याबाबत सखोल माहिती दिली. विद्यालयाच्या प्राचार्या भारती कदम यांनी, आपण जर मनापासून व आवडीनुसार जे क्षेत्र निवडतो त्याविषयी सातत्याने आणि जिद्दीने प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज म्हामुणकर यांनी केले. या वेळी वरिष्ठ शिक्षक नितीन ढेपे, नैना परब, दिलीप सकपाळ, सायली बनकर व निशिकांत गोगावले उपस्थित होते.

### शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**रोहे** : शहरात रायगडचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



बुधवारी (दि. २५) करण्यात आले. या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे, ज्येष्ठ नेते मोतीराम गिजे, सुधाकर शिंदे, विजय बोरकर, उस्मान रोहेकर, उपतालुकाप्रमुख संदेश मोरे, विभाग प्रमुख उद्देश वाडकर, विकास पाटील, शहर प्रमुख मंगेश रावकर, माजी सरपंच गणेश खरविले, संदेश डोलकर, आशिष स्वामी, माजी सरपंच स्वामिनी डोलकर, शैलेश सकपाळ आदींसह  कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री धाविर महाराजांचा पालखी सोहळा उत्साहात

## रायगड पोलिसांनी दिली सशस्त्र मानवंदना; भक्तांचा महापूर

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या पालखी सोहळ्यास बुधवारी (दि. २५) पहाटे मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या वेळी रायगड पोलिसांच्या वतीने पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर व पथकाने श्री धाविर महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली. हा सलामी सोहळा पाहण्यासाठी मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती. सलामीसोहळा पाहण्यासाठी भल्या पहाटेपासून मंदिर परिसरात भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.





या वेळी पालकमंत्री उदय सामंत, निलम शिर्के सामंत, मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष मयुर पायगुडे, राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजयराव मोरे, शिवसेना ठाकरे तालुकाप्रमुख समीर शेडगे, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, शिवसेना शिंदे तालुकाप्रमुख अ‍ॅड. मनोज शिंदे माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, संतोष पोटफोडे, विश्वस्त नितिन परब, समिर सकपाळ, आनंद कुलकर्णी, महेश सरदार, संदीप सरफळे, आप्पा देशमुख, हेमंत कांबळे, अमित उकडे, राजेश काफरे, रविंद्र चाळके, निलेश शिर्के आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उत्सवानिमित्त मंदिराचा संपूर्ण परिसर विविधरंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आले होते. पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळ्यांनी वातावरण प्रसन्न झाले होते. भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळ्यांच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर महाराजांची पालखी पारंपरिक वाद्यांच्या गजरात मार्गस्थ झाली. शहरातील ठरलेल्या मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्तांना दर्शन देत पालखी दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिरात परतणार आहे.

या वेळी पुन्हा महाराजांना पोलीस मनवंदना देण्यात येते. पालखीच्या स्वागतासाठी शहरात ठिकठिकाणी फुलांनी आणि सडारांगोळ्यांनी बहरलेले रस्ते आणी विशेष करून रात्रीच्या वेळी करण्यात येत असलेली रोषणाई या सोहळ्याला एक वेगळे रूप प्राप्त करून देते.

रोह्यात पालखीच्या दर्शनासााठी येणाऱ्या भाविकांसाठी शहरात ठिकठिकाणी विविध सामाजिक मंडळांमार्फत थंड पेये आणि अल्पपोहाराची व्यवस्था करण्यात येते. येथील आशीर्वाद मंडळातर्फे गेली अनेक वर्ष भाविकांसाठी मोफत भोजन व्यवस्था केली जात आहे.

## पेणच्या हमरापूरमध्ये समाजमंदिराचे भूमिपूजन



**पेण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील हमरापूर गावाच्या विकासाला अधिक प्राधान्य देत कुंभार समाजाच्या गोरोबाकाका समाज मंदिरासाठी आमदार रवीशेठ पाटील यांच्या माध्यमातून सात लाख रुपये निधी मंजूर केला आहे. हमरापूर गावाच्या विकासकामांना अधिक गती देण्याचे काम ते करीत असल्याचे भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

हमरापूर येथील गोरोबा काका समाजमंदिराचे भूमिपूजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सरपंच राकेश दाभाडे, माजी सरपंच सचिन पाटील, उपसरपंच संजय पाटील, बंधु दाभाडे, मयुर सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य ओमकार पाटील, रवींद्र शेदवळ, पायल सुर्वे, सायली मांडलेकर, दिलीप म्हात्रे कुंभार समाज अध्यक्ष शरद मांडलेकर, अनिल मांडलेकर, सुधाकर पनवेलकर, सोनल मांडलेकर, सोनल पनवेलकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना उपाध्यक्ष वैकुंठ पाटील म्हणाले की, या भागातील गणेशमूर्ती कारखानदार आताच मोकळे झाले आहेत. शासनाच्या योजनांचा अधिक फायदा घेण्यासाठी त्यांच्याही सातत्याने प्रयत्न असून येत्या काही दिवसातच या भागातील दोन रस्त्यांकरिता प्रत्येकी पाच लाखांचा निधीही एमएमआरडीतून मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे आमदार रवीशेठ पाटील यांच्या माध्यमातून हमरापूर गावाच्या विकासकामांना अधिक चालना देऊन या भागाचा लवकरच कायापालट होणार असल्याचे त्यांनी सांगितले, तर पेण तालुक्यासह हमरापूर गावाच्या विकासकामांना कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देणारे आमदार रवीशेठ पाटील यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहणार असल्याचे सरपंच राकेश दाभाडे यांनी सांगितले.

## विहूर पुलावरील रस्त्याची दूरवस्था

### खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास; संरक्षक कठडेही तुटलेले

**मुरूड : प्रतिनिधी**

मुंबई-मुरूड या मुख्य रस्त्याला जोडणारा विहूर पूल अत्यंत महत्त्वाचा असतानाही या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. २०२१च्या मुसळधार पावसामुळे पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे वाहून गेले होते. असे असतानाही या पुलावरील रस्त्याची अथवा संरक्षक कठडेही बांधण्यात आलेले नाही. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

मागील दोन वर्षांपासून हे काम प्रलंबित राहिल्याने या पुलावरील रस्ता खड्डेमय झाला आहे. त्यामुळे प्रवाशांना सध्या खड्डे व धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकी चालकांना या रस्त्यावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागते. मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता यांनी सांगितले होते की, पावसाळा झाल्यावर येथे लवकरच छोटा पूल बांधण्यात येणार आहे. पावसाळा संपला तरी पुलाचे काम सुरू होत नाही, यामुळे प्रवाशी नाराजी व्यक्त करीत आहेत.

याबाबत सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे उपअभियंता एस. गोरे यांना याबाबत विचारणा केली असता, हॅम्प योजनेतून साळाव ते आगरदांडा हे काम सुरू होणार आहे. या वेळी रस्त्याची रुंदी १० मीटर होणार आहे. फक्त नांदगावमधून ही रुंदी प्राप्त होऊ शकणार नाही कारण आजूबाजूला दुकान व घरे असल्याने येथील समस्या जटिल आहे. बाकी सर्व बाजूकडून रुंद चांगली मिळणार आहे, असे सांगितले.



# माणगावमध्ये नवरात्रोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगर ग्रामस्थ व महिला मंडळातर्फे सलग दुसऱ्या वर्षी कै. प्रवीण रवींद्र भोईर यांच्या स्मरणार्थ आयोजित नवरात्रोत्सव विविध कार्यक्रमांनी मंडळाचे संस्थापक सुभाष पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री हनुमान मंदिर संगमेश्वर नगर याठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. या नवरात्रोत्सवात मैथिली अमित सावंत या लकी ड्रॉच्या विजेत्या ठरल्या.

नवरात्रोत्सवात मंडळातर्फे दररोज दांडिया रास व विविध कार्यक्रम उत्साहात घेण्यात आले. मंडळातर्फे यंदा नागरिकांसाठी चमचा गोटी, वेशभूषा, संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा व लकी ड्रॉ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. वेशभूषा स्पर्धेचे परीक्षण पत्रकार सलीम शेख, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मोरे व माजी नगरसेविका माधुरी मोरे यांनी केले. चमचा गोटी महिला गट प्रथम अनुष्का प्रवीण भोईर, द्वितीय श्रद्धा प्रवीण भोईर, वरिष्ठ महिला गट प्रथम शुभांगी सुभाष पारखे, द्वितीय लता शशिकुमार सावंत, चमचा गोटी पुरुष गट प्रथम स्वराज अमित सावंत; संगीत खुर्ची महिला गट विजेती अस्मिता अमित सावंत, पुरुष गटात विजेता रवींद्र कृष्णा बामणे; रांगोळी स्पर्धा लहान गटात विजेती रिद्धी रवींद्र बामणे, खुल्या गटात प्रथम स्वाती रवींद्र पांचाळ व द्वितीय सानिका सचिन सावंत; वेशभूषा स्पर्धा लहान गटात प्रथम क्रमांक स्वराज अमित सावंत, द्वितीय मैथिली अमित सावंत, तृतीय रिया भरत सावंत, मोठा गट प्रथम अंकिता सदाशिव पोवळे, द्वितीय स्वाती रवींद्र पांचाळ, तृतीय सानिका सचिन सावंत या विजेत्या स्पर्धकांना मंडळाचे पदाधिकारी तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

नवरात्रोत्सवासाठी मंडळाच्या सर्व सदस्य, पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




## मुरूडकरांना मिळणार गारंबी, सवतकड्याचे पाणी

### ‘अमृत २.०’ अंतर्गत धरणांचे होणार पुनरूज्जीवन

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

नवाब कालाळापासून मुरुड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी गारंबी धरण व सवतकडा धरणावरील योजनांचे शासनाच्या अमृत २.० योजनेंतर्गत पुनर्जीवित करण्याचे ठरले आहे. या अंतर्गत धरणातील गाळ काढणे, धरणातील पाणी गळती थांबवणे व धरणातून शहराला नवीन पाईपलाईन टाकणे ही कामे होणार आहेत.



मुरूड शहर पर्यटनस्थळ असल्याने पाण्याला मागणी वाढली म्हणून खारआंबोली येथे मोठे धरण बांधण्यात आले आणि शहराला मुबलक पाणीपुरवठा सुरू झाला. त्यामुळे गारंबी व सवतकडा धरणातील पाण्याचा वापर कमी झाला आणि या धरणाकडे दुर्लक्ष झाले. या धरणाच्या पाण्यासाठी कोणतेही वीज पंप वापरावे लागत नाही. त्यामुळे पालिकेचा खर्च कमी होतो. या उलट खारआंबोली धरणातील पाण्यासाठी दोन मोठे पंप वापरले जातात त्याचे बिल लाखात येत असल्याने पालिकेचा खर्च वाढतो, म्हणून पालिकेने शासनाच्या अमृत २.० योनानेंतर्गत गारंबी व सवतकडा पाणीपुरवठा योजना पुनर्जीवित करण्याचे ठरले आहे. गारंबी धरण पुनर्जीवित झाल्यावर वर्षातील आठ महिने गारंबी धरणाचे शुद्ध पाणी मुरुडकरांना प्यायला मिळणार आहे. उरलेले चार महिने खारआंबोली धरणाचा वापर होणार होता.

**गारंबी व सवतकडा पाणीपुरवठा योजना शासनाच्या अमृत २.० योजनेंतर्गत कामाचा आढावा घेऊन अंदाजपत्रके तयार करण्याचे काम सुरू आहे. शासनाची मंजुरी झाल्यावर निविदा होऊन कामाला सुरुवात सहा महिन्यात होईल.**

**-पंकज भुसे, मुख्याधिकारी, मुरूड**

## माणगाव येथून दुचाकीची चोरी

**माणगाव** : येथील भूमी अभिलेख कार्यालयासमोरील मोकळ्या जागेतून अ‍ॅक्टिव्हा गाडी अज्ञात चोरट्याने सोमवारी (दि. २३) सकाळी चोरून नेली. याबाबतची फिर्याद चंद्रकांत घारू सत्वे (वय ५६, रा. उणेगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

फिर्यादी चंद्रकांत सत्वे यांची पांढरी अ‍ॅक्टिव्हा गाडी (एमएच ०६ बीके ७४७७) अंदाजे ६५ हजार रुपये किमतीची गाडी चोरट्याने चोरून नेली. या घटनेची नोंद पोलीस ठाण्यात केली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

## आंबिया बहरातील फळपिकांचे विमा संरक्षण करण्याचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

येत्या आंबिया बहारामध्ये विविध हवामान धोक्यामुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरीता कृषि विभागामार्फत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेमध्ये सहभागाकरिता विमा पोर्टल सुरू झाले असून तापमान, वेगाचा वारा, गारपीट व सापेक्ष आर्द्रता या धोक्यापासून निर्धारीत कालावधीत सहभागी होऊन फळबागांचे संरक्षण करा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर खालापूर यांनी केले आहे.

कोकण विभागामध्ये अधिसुचित केलेल्या महसूल मंडळात केळी, आंबा, काजू पिकांच्या उत्पादनक्षम फळबागांना विमा संरक्षण देण्यात येईल. कर्जदार शेतकरी व बिगरकर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक असेल. खातेदार शेतकरी व्यतिरिक्त कुळ व भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांनाही योजना लागू राहील.

एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकांसाठी चार हेक्टर क्षेत्रावर विमा नोंदणी करता येईल. विमा अर्ज सोबत फळबागेचा जीओ टॅगिंग असलेला फोटो विमा पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील.

एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग व आंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच बहाराकरीता खिमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. ही योजना रायगड जिल्हामध्ये भारतीय कृषि विमा कंपनी लि. मार्फत राबविण्यात येत आहे.

फळपिक विमा योजनेमध्ये सहभागी होण्याची अंतिम मुदत काजू व आंबा पिकाकरीता ३० नोव्हेंबरपर्यंत आहे. अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, वेगाचा वारा, गारपिट यांच्यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. खालापूर तालुक्यातील फळबाग शेतकरी यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी केले आहे.

# हार्दिक पांड्या अनफिटच!

## आणखी किमान दोन सामन्यांना मुकण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडला पराभूत करीत गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचलेला भारतीय संघ सध्या वर्ल्डकप विजयासाठी फेव्हरेट मानला जात आहे. यंदाच्या वर्ल्डकपमध्ये आतापर्यंतचे पाचही सामने भारताने जिंकले आहेत, पण बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात पायाच्या घोट्याला दुखापत झालेला हार्दिक पांड्या अद्याप बरा झाला नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे भारतीय संघासाठी ही चिंतेची बाब आहे.



हार्दिक पांड्याला एक अष्टपैलू खेळाडू म्हणून भारतीय संघात समाविष्ट करण्यात आले आहे. त्याच्या समावेशामुळे जशी मधल्या फळीतील फलंदाजीला मजबुती आली तशीच गोलंदाजीमध्येही अधिक धार आली आहे. त्यामुळे भारतीय संघाच्या विश्वचषक विजयाच्या प्रवासात हार्दिक पांड्या महत्त्वाचा खेळाडू आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात घोट्याला दुखापत झाल्यामुळे पहिल्याच ओव्हरमध्ये तो मैदानाबाहेर गेला होता. त्यानंतर तो मैदानावर परतलाच नाही. या दुखापतीमुळे त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यातूनही बाहेर पडावे लागले. येत्या २९ ऑक्टोबर रोजीचा गतविजेत्या इंग्लंडविरुद्धचा सामना आणि त्यानंतर २ नोव्हेंबर रोजी खेळवला जाणारा श्रीलंकेविरुद्धचा सामना या दोन्ही सामन्यांना हार्दिक मुकणार आहे. त्यामुळे आता लीगमधल्या थेट शेवटच्या दोन सामन्यांसाठीच हार्दिक उपलब्ध होऊ शकेल अशी शक्यता आहे. बीसीसीआयचे वैद्यकीय पथक त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे.

दरम्यान, दुखापत झाल्यानंतर सध्या हार्दिक पांड्या बंगळुरूच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये उपचार घेत आहे. तो कोलकाता किंवा मुंबईतील सामन्यांमध्ये संघात परतेल, असे वृत्त एका वृत्तसमूहाने सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.

### ...तर अक्षर पटेलला संधी

भारताचा अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल विश्वचषकापूर्वी दुखापतग्रस्त झाला व त्याला विश्वचषकातून बाहेर व्हावे लागले. त्याच्या जागी फिरकीपटू आर. अश्विनचा संघात समावेश करण्यात आला. पटेल पूर्णपणे बरा झाला असून सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये खेळत आहे. हार्दिक पांड्या तंदुरुस्त नसेल, तर त्याच्या जागी पटेलचा समावेश होऊ शकतो, मात्र यासाठी आयसीसीची मान्यता घ्यावी लागेल.

# मुंबई विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत 'हिरवळ'च्या अल्तमशचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठात अंतर्गत आंतर महाविद्यालयीन अ‍ॅथलेटिक्स स्पर्धा चिपळूणमधील डेरवण (जि. रत्नागिरी) येथील एसव्हीजेसीटी कॉलेज येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाड येथील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील विद्यार्थ्याने यश प्राप्त केले आहे. अल्तमश लंबाडे (द्वितीय वर्ष आयटी) याने बांबू उडीत तृतीय क्रमांक पटकावला.

महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश कदम यांनी अल्तमश लंबाडे याचे त्याने मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक केले तसेच विविध क्रीडा प्रकारात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धांसाठी प्रोत्साहन दिले. या मुलांना मार्गदर्शक म्हणून विठ्ठल नातेकर, प्रा. मंदार पिंगळे व प्रा. कपिल जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया, प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी अल्तमशचे अभिनंदन केले.



# आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालय संघाला रौप्यपदक

## तीन खेळाडूंची आंतरविभागीय स्पर्धेसाठी झाली निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या मुंबई झोन क्र. १च्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई केली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलींच्या या संघातील रश्मी मच्छिंद्र पाटील, ऋतुजा प्रकाश पाटील व रूपाली उमेश जाधव या तीन खेळाडूंची मुंबई विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, महाविद्यालयाने मागील शैक्षणिक वर्षात नॅकच्या चौथ्या मूल्यांकनात ए प्लस मानांकन प्राप्त केले. त्यानंतर विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश संपादन करून महाविद्यालयाची घोडदौड उत्कृष्टरित्या सुरू ठेवल्याबद्दल अभिमान वाटत आहे. या आनंदाच्या वेळी त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच जे.एम.म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ. नरेश मढवी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य वाजीदा सिद्दवत्तम, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, प्रा. प्रवीण गायकर, प्रशिक्षक अक्षय जितेकर, तेजा महादेव सपकाळ व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी मार्गदर्शन केले.

# कर्जत मुद्रे येथे कबड्डी मैदानाचे पूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील नवकुमार क्रीडा मंडळ मुद्रे बुद्रुकच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दसऱ्याच्या मुहूर्तावर कबड्डी क्रीडांगणाची स्वच्छता व पूजाअर्चा करून आजी-माजी खेळाडूंच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यासह यंदाच्या हंगामासाठी मैदान सज्ज झाले आहे.

मुद्रे गावातील कबड्डी खेळणारे खेळाडू अथक मेहनतीच्या जोरावर सराव करून तालुक्यातील आणि जिल्ह्यातील अनेक कबड्डी स्पर्धेत सहभागी होऊन यश मिळवितात. मुद्रे गावची कबड्डी आणि विजयी परंपरा गेली ७५ वर्षे जुनी आहे. नवकुमार क्रीडा मंडळातून अनेक कबड्डीपटू घडले असून त्यांनी मोठा नावलौकिकही मिळवला आहे. दसऱ्याच्या निमित्ताने सर्व खेळाडूंना कबड्डी खेळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.


सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | आज़ादी का अमृत महोत्सव | G20 भारत 2023 INDIA



ध्यास विकासाचा... महाराष्ट्र घडविण्याचा!



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

श्री.नरेंद्र मोदी मा. प्रधानमंत्री यांच्या हस्ते
१४,००० कोटी रुपयांहून अधिक
विकास प्रकल्पांचा शुभारंभ


'नमो शेतकरी महासन्मान निधी'

- केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाची स्वतंत्र योजना.
- केंद्राचे रु.६००० आणि राज्याचे रु.६००० असे एकूण रु.१२००० दरवर्षी पात्र शेतकरी कुटुंबाला मिळणार.
- नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेसाठी सन २०२३-२४ करिता ६९०० कोटी रुपयांची तरतूद.
- सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांना १७१२ कोटी रुपयांचा पहिल्या हप्त्याचे वितरण करुन शुभारंभ.

| विविध विकास प्रकल्प | प्रकल्प खर्च |
|---|---|
| शिर्डी येथे भाविकांच्या सुविधेसाठी नवीन दर्शन रांग संकुलाचे उद्घाटन | रू.१०९ कोटी |
| निळवंडे धरण डाव्या कालव्याचे लोकार्पण | रू.५१७७ कोटी |
| राष्ट्रीय महामार्ग-१६६ च्या सांगली ते बोरगाव चौपदरीकरण टप्प्याचे लोकार्पण | रू.११०२ कोटी |
| जळगाव ते भुसावळ तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे लोकार्पण | रू.६४० कोटी |
| कुर्डुवाडी-लातूर रोड रेल्वे विभागाच्या विद्युतीकरण प्रकल्पाचे लोकार्पण | रू.२३७ कोटी |
| मनमाड गॅस टर्मिनल येथे अतिरिक्त सुविधांचा शुभारंभ | रू.२२१ कोटी |
| अहमदनगर येथे माता व बाल आरोग्य जिल्हा रुग्णालय भूमिपूजन | रू.२५.४५ कोटी |
| राष्ट्रीय आयुष मिशन कार्यक्रमाअंतर्गत अहमदनगर येथील आयुष रुग्णालय उद्घाटन | रू.९ कोटी |

आयुष्मान कार्ड व स्वामित्व कार्डचे वितरण

- प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्ष रु.५ लाखांपर्यंत आरोग्यकवच
- १.११ करोड आयुष्मान कार्ड वितरणाचा शुभारंभ
- स्वामित्व योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना सनद वाटप



स्थळ : शिर्डी विमानतळाजवळ, काकडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर.
वेळ : गुरुवार, दि. २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता.

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com